मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले




। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : 3 ■ अंक : ७९ ■ गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## थोडक्यात



**नवीन दिवाणी न्यायाधीश इमारतीवरील दोन मजल्यांच्या प्रत्यक्ष कामाला होणार सुरुवात; आमदार प्रशांत ठाकूर, ॲड. पारिजात पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ॲड. मनोज भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पनवेल वकील संघटनेच्या पाठपुराव्याला यश**
**( दैनिक युवक आधार )**

### मृत्यू नोंदणीसाठी आता डॉक्टरांना जावे लागणार पालिकेत!



**मुंबई :** घरात मृत्यू झालेल्या व्यक्तीची तपासणी करून त्याचे मृत्यू प्रमाणपत्र देणाऱ्या फॅमिली डॉक्टरलाच आता मृत्यू नोंदणीसाठी थेट महापालिकेच्या नागरी सेवा सुविधा केंद्रमध्ये जावे लागणार आहे. मुंबई महापालिकेच्या या अजब नियमामुळे फॅमिली डॉक्टर त्रस्त झाले आहेत.मुंबईत अनेकांचा घरामध्ये वृद्धापकाळाने किंवा आकस्मित मृत्यू होतो. अशावेळी नातेवाईक आपल्या फॅमिली डॉक्टरला घरी बोलवतात. डॉक्टर तपासणी केल्यानंतर मृत्यू घोषित करून प्रमाणपत्र देतात. हेच प्रमाणपत्र स्मशानभूमीत दिल्यानंतर त्या मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार केले जातात. हे अंत्यसंस्कार झाल्यानंतर स्मशानभूमीतून एक पावती देण्यात येते.ही पावती मृत्यू प्रमाणपत्रासाठी अर्ज भरताना महापालिकेच्या नागरी सेवा केंद्रामध्ये जमा करावी लागते. त्यानंतर आठ ते दहा दिवसांत मृत्यू प्रमाणपत्र मिळते. असा नियम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. पण महापालिकेने आता अचानक या नियमात बदल केला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांवर टांगती तलवार

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याचा दावा करण्यात आला होता. त्यावर मंगळवारी झालेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने आपण शुक्रवारी अंतरिम आदेश देऊ, असे सांगितले आहे. शुक्रवारी दुपारी १२ वाजता ही सुनावणी होणार आहे. त्यामुळे या निवडणुकांवरील टांगती तलवार कायम आहे.



**सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी शुक्रवारी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेल्याप्रकरणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्यासंबंधी सविस्तर माहिती मागवली असून सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी म्हणजे २८ नोव्हेंबर रोजी ठेवली आहे.

**निकालाच्या अधीन निर्णय**

ज्या निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर झाला आहे त्या निवडणुका झाल्या तर अंतिम निकालाच्या अधीन राहून त्याचा निर्णय होऊ शकतो. पण आज तसा काही आदेश देण्यात आला नाही. मात्र, आम्ही निवडणूक थांबवणार नाही, असे संकेत न्यायालयाने दिले. सर्वोच्च न्यायालयाने आज स्पष्टपणे सांगितले की, ओबीसींना आरक्षण मिळाले पाहिजे, त्यांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे.

## २६ नोव्हेंबर - संविधान दिन उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** भारताच्या संविधान स्वीकृती दिनानिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आज (२६ नोव्हेंबर) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पुर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अनेश ढवळे, अंकुश पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविक करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनाने झाली. यावेळी भूपेंद्र पाटील यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून लोकशाही, न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना मुख्यमंत्र्यांचे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (संतोष पाटील) :** मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी भ्याड दहशतवादी हल्ला झाला. हा हल्ला परतवून लावताना या हल्ल्यात मुंबई पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी तसेच सुरक्षा दलातील अधिकारी शाहिद झाले. या हल्ल्यात वीरमरण आलेल्या शहिदांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणातील त्यांच्या स्मृती स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून



अभिवादन केले. शहीद स्मारक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, कौशल्य, उद्योजकता व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि शहीद कुटुंबीयांचे सदस्य उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना अभिवादन केले.मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी शहिदांच्या कुटुंबीयांची यावेळी भेट घेत त्यांच्या प्रति संवेदना व्यक्त केल्या. या अभिवादन कार्यक्रमाचे परेड कमांडर राखीव पोलीस निरीक्षक रमेश लोखंडे यांनी संचलन केले.

## २६/११ च्या हुतात्म्यांना पुणेकरांची अनोखी श्रद्धांजली; सारसबागेत बँडद्वारे मानवंदना, चित्रकला स्पर्धेचंही आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पुणे :** शहर पोलीस आणि शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ ट्रस्ट यांनी मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेल्या वीर जवानांच्या स्मरणार्थ पुण्यात विशेष श्रद्धांजली कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. सारसबाग येथे पुणे पोलीस दलाच्या बँड पथकानं भावपूर्ण स्वरांमध्ये हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. यावेळी मोठ्या संख्येनं पुणेकर नागरिक उपस्थित होते आणि सर्वांनी एकत्रितपणे हुतात्म्यांना श्रद्धासुमन अर्पण करून त्यांच्या



बलिदानाला विनम्र अभिवादन केलं. यावेळी पोलीस अधिकारी, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सारसबागेतील मानवंदनेनंतर जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेचं देखील आयोजन करण्यात आलं होतं.

**पुणे पोलिसांनी वाहिली श्रद्धांजली :** महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात दाखवलेल्या अतुलनीय धाडस आणि शौर्याला मानवंदना देण्यासाठी पुणे शहर पोलीस दलाच्या पुढाकारानं दरवर्षीप्रमाणे यंदाही सारसबाग येथे विशेष श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला.


आज सकाळी पुणे पोलीस दलाच्या बँड पथकाने भावपूर्ण स्वरांमध्ये हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.

## सोशल मीडियावर विनापरवाना प्रचार करणाऱ्या उमेदवारांवर होणार कारवाई

**दैनिक युवक आधार**

**बारामती :** राज्यात होणारी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आपल्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी तसंच कार्यकर्ते जोरदार प्रचार करताना दिसत आहेत. असं असताना राज्यात अनेक ठिकाणी निवडणूक आधीच बिनविरोध झाली आहे. दरम्यान बारामतीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत सोशल मीडिया आणि माध्यमांवर प्रचार करण्यासाठी परवानगी आवश्यक आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पंकज अनिल भुसे यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

**...तर निवडणूक आयोग करणार कठोर कारवाई :** नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर बारामतीत उमेदवारांना सोशल मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील प्रचारासाठी एमसीएमसीची (Media Certification & Monitoring Committee)



पूर्वपरवानगी घेणं सक्तीचं करण्यात आलंय. या नियमाचं उल्लंघन केल्यास निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा निवडणूक निर्णय अधिकारी पंकज अनिल भुसे यांनी पत्रकाद्वारे दिला.

**प्रचारासाठी परवानगी घेणं बंधनकारण :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फेसबुक, व्हॉट्सअप, यूट्यूब, इन्स्टाग्राम, एक्स यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तसंच कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जाहिरात, व्हिडिओ, प्रचार सामग्री यातून प्रचार करण्यासाठी एमसीएमसीकडून मान्यता घेणे बंधनकारक आहे. मात्र काही उमेदवार परवानगी न घेता थेट प्रचार सुरू करत असल्याचं निदर्शनास आल्यानं प्रशासन सतर्क झालं आहे.

## भटक्या कुत्र्यांसंदर्भात कारवाईचे आदेश!; राज्य सरकारची नवीन नियमावली जारी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्यासह देशाच्या विविध भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. या भटक्या कुत्र्यांमुळे लहानांसह मोठ्यांवर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे.

भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी आता भटक्या कुत्र्यांना खायला देण्याची जागा निश्चित करावी. मोकळ्या जागेत भटक्या कुत्र्यांना खायला दिले तर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्य सरकारने दिला आहे.

भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे बंधनकारक केले असून निर्बीजीकरण व लसीकरणानंतर पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी राज्य सरकारने नवीन नियमावली जारी केली आहे.

मुंबईसह राज्यात भटक्या



कुत्र्यांची दहशत वाढली असून लहान मुलांसह मोठ्यांचा चावा घेण्याचे प्रमाण वाढले आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात अनेकांना जीवाला मुकावे लागले आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने राज्यातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. मुलांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या वाढत्या घटना लक्षात घेता न्यायालयाने राज्य शासनाला तातडीने कार्यवाही करण्यास सांगितले. त्यानुसार राज्य सरकारने नवीन नियमावली जारी केली आहे.

**हेल्पलाईन सुरू करा**

नागरिकांना भटक्या कुत्र्यांबाबत तक्रार देण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन विकसित करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

**आश्रय निवाऱ्याची व्यवस्था करा**

भटक्या श्वानांसाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतींनी त्यांच्या क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करावी, असेही आदेशात म्हटले आहे.

**लस, इम्युनोग्लोब्युलिनचा साठा अनिवार्य!**

भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीची उपचारसुविधा मिळावी यासाठी रुग्णालयांमध्ये अँटी रेबीज लस व इम्युनोग्लोब्युलिनचा साठा अनिवार्य केला आहे. सर्व सरकारी रुग्णालयांना पुरेसा साठा ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्या परिसरात कुत्र्यांची संख्या जास्त आहे, अशा सार्वजनिक ठिकाणांवर विशेष मोहीम राबवून कुत्र्यांचे नियंत्रण करण्यात यावे.

## माळशेज घाट ‘न्यायाच्या’ प्रतीक्षेत!; दोन हजार कोटींचा खर्च; तरीही अपघातांची मालिका कायम

**दैनिक युवक आधार**

म्हारळ - मुरबाड -टोकावडा-माळशेज घाट-खुबी या मार्गाच्या उन्नतीसाठी तब्बल दोन हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात माळशेज घाटातील मूलभूत समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत. त्यामुळे हा घाट आजही अपघातांचे केंद्रबिंदू ठरत असून, स्थानिक तसेच पर्यटकांकडून घाटाला ‘न्याय’ मिळण्याची मागणी जोर धरत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मुरबाड-माळशेज घाट रस्ता धोकादायक व जीवघेणा ठरत आहे.

अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्त्याचे दुपदरीकरण सुरू असले, तरी घाटातील सर्वात महत्त्वाचा भाग अरुंद रस्ता आजही तसाच आहे.

दरवर्षी दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे अनेक जीव जातात. या ठिकाणी लोखंडी जाळ्या बसवण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च



झाले;

मात्र रुंदीकरण न झाल्याने अपघात सुरूच आहेत.सध्या मुरबाड-सरळगाव-टोकावडा-थीदवीपर्यंत रस्त्याचे काम सुरू आहे. परंतु वाहनचालक आणि प्रवासी यांची प्रमुख मागणी म्हणजे माळशेज घाटात दुपदरी रस्ता करणे, वनविभाग व पुरातत्त्व विभागाकडून परवानगी घेऊन घाटातून बोगदा काढणे, हा बोगदा जुन्नरच्या खुबी गावाशी जोडणे आदी कामे करणे गरजेचे आहे.

माळशेज घाटातील खोल दरीलगतच्या संरक्षण भिंती अनेक ठिकाणी खचल्या आहेत.

कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

हा मार्ग पुणे-नगर-जुन्नर-आळेफाटा-ओतूर-पंढरपूर-जेजुरी-शिर्डीकडे जाणाऱ्या वाहनांचा दुवा आहे. तसेच भीमाशंकर, अजबळेवाडी, हरिश्चंद्रगड, माळशेज घाट या पर्यटनस्थळांकडे जाण्यासाठी एकमेव मार्ग असल्याने घाटावरील भार प्रचंड आहे.थीदवी गावाजवळून उड्डाणपूल काढून, तो थेट हनुमान मंदिराजवळील बोगद्याशी जोडल्यास वाहतूककोंडी आणि अपघात मोठ्या प्रमाणात टाळता येतील, असा आवाज स्थानिकांकडून उठतो आहे. याच बोगद्यापासून खुबी गावापर्यंत समृद्धी महामार्गासारखा रुंद रस्ता उभारण्याची मागणीही जोर धरत आहे

# टेंभुर्णी शहरात संविधान दिनाच्या निमित्ताने भव्य महारॅली काढण्यात आली

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी :- अनिल ससाने**

टेंभुर्णी प्रतिनिधी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर मधील झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पुष्पहार अर्पण करून संविधान पुजन सरपंच सौ सुमनताई लक्ष्मण म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले... यावेळी विचार पीठावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष रामधन पाटील कळंबे महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब पाटील गौतम म्हस्के प्रदिप मघाडे चेअरमन भिकनखॉं पठाण मा सरपंच विष्णू जमधडे राजुखोत माजी सुभेदार पी के वाघमारे मा जिल्हा परिषद सदस्य किसनराव मघाडे बाबूराव मघाडे प्रशांत शिंदे कपिल जाधव राहुल दांडगे आदींची उपस्थिती होती यावेळी भारतीय संविधान वर बोलताना महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष रावसाहेब अंभोरे यांनी भारतीय संविधान या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केलेभारत आज संविधान दिन साजरा करत आहे. देशाच्या लोकशाहीला दिशा देणाऱ्या आणि नागरिकांच्या हक्क–कर्तव्यांची स्पष्ट व्याख्या करणाऱ्या या महान दस्तऐवजाला आज पुन्हा एकदा अभिवादन करण्याचा दिवस आहे. स्वातंत्र्यानंतर देशाला एक बळकट, न्याय्य आणि लोकाधारित व्यवस्था देण्याची जबाबदारी आपल्या संविधानाने निभावली आणि आजही तेवढ्याच दृढतेने ती निभावत आहे.असे महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब पाटील अंभोरे यांनी आपले विचार व्यक्त केले

संविधानाने प्रत्येक नागरिकाला - न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुतेची हमी दिली. या मूल्यांवर देशाची लोकशाही उभी आहे. मात्र या हक्कांसोबतच संविधान कर्तव्यांचीही आठवण करून देते — समाजात शांतता राखणे, भेदभावाला आव्हान देणे आणि राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देणे ही जबाबदारी प्रत्येकावर आहे.

आजच्या दिवसाचे महत्त्व एवढेच—लोकशाही टिकते ती जागरूक नागरिकांमुळे, संविधानाचे पालन, कायद्याचा आदर आणि समाजातील एकता हीच देशाच्या विकासाची खरी पायाभरणी आहे.

संविधान दिनानिमित्त भारतीय लोकशाहीला बळकटी देण्याचा, समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज ऐकण्याचा आणि न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवण्याचा निर्धार नव्याने करूया.अशी शपथ घेतली यावेळी कार्यक्रमास जनार्दन झोरे रामधन पाटील कळंबे मा उपसरपंच फैसल चाऊस डिगाबंर भिसे रजित जाधव सुर्यप्रकाश मघाडे ज्ञानेश्वर उखर्डे हजारो महिला जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी समाज बाधव महारॅली मध्ये सहभागी झाले होते रॅली ची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक नालांदा बुद्ध विहार येथून छत्रपती शिवाजी चौक मेन रोड जुने बसस्थानक मेन रोड गांधी चमन मार्गाने जीरी माळी गल्ली राममंदिर रोड धनगर गल्ली साठेनगर रॅली चे आगमन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक नालांदा बुद्ध विहाराच्या मैदानात राष्टगीताने समारोप करण्यात आला आहे..

# स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया ची धडाकेबाज कारवाई

## घरफोडी करणारी आंतरराज्यीयटोळी स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया च्या जाळयात

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी गोंदिया**

दिनांक १४/११/२०२५ रोजी फिर्यादी नामे नारायण गोरेलाल पांधरे वय ४१ वर्ष रा. विचारपूर पो. दरेकसा यांनी पो.स्टे. सालेकसा येथे रिपोर्ट दिली की दिनांक १४/१०/२०२५ रोजी रात्र दरम्यान हे आपल्या घरी कुटुंबासह राहते घरात झोपले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे जुन्या घराचा दरवाज्याचा कुलूप तोडुन आत प्रवेश करुन मधल्या खोलीतील टिनाच्या पेटित असलेले नगदी ८६०००/- रु बेडरुमध्ये कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे १) एक जोड पिवळ्या धातूचे कानातील टॉप्स ,मंगळसुत्र दोन्ही मिळून ०१ तोळे ०३ ग्राम अंदाजे ५१,५००/-रु., जुने वापरते पायातील चांदीच्या पैरपट्ट्या २० तोळे अंदाजे किमती १४,०००/- रु असा एकूण १,५१,५०० रु. मुद्देमाल चोरुन नेल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस



स्टेशन सालेकसा येथे अपराध क्रमांक ४९८/२०२५ कलम ३०५ , ३३५(४),३ (५) भारतीय न्याय संहिता चा गुन्हा दाखल करण्यात आला व सदर गुन्हयात अज्ञात आरोपीचा शोध सुरु होता.

सदर गुन्हयाचा संमातर तपास श्री पुरूषोत्तम अहेरकर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया येथील अधिकारी/अंमलदार हे करीत असतांना प्राप्त गोपनिय माहीती व तांत्रीक विश्लेषणच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात आले असता गुन्हयातील आरोपी हे कमलेश सुधाकरजी राऊत, वय ३७ वर्ष, रा. गॉडप्लॉट, वर्धा ,रामेश्वर सुखराम नागपूरे यय-४३ वर्ष, रा. चिचोली बालाघाट म.प्र. व त्याचे साथीदार यांनी सदरची चोरी केले असल्याचे निष्पन्न झाले.

सदर आरोपीचा स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया हे शोध घेत असता गोपनीय माहीती चे आधारे आरोपो नामे १) कमलेश सुधाकरजी राऊत, वय ३७ वर्ष, रा. गॉडप्लॉट, वर्धा , २) लखन नाता बोरसे वय-३२ वर्ष, रा. अशोकनगर वार्ड क्र. २८ वर्धा, जि. वर्धा, ३) राजु अवधुत वासकर, वय-३२ वर्ष रा. कान्होलीबारा, ता. हिंगना, जि. नागपूर ४) नरेंद्र वासुदेव वझे, बय-३९ वर्ष रा.दुर्गा मंदीर जवळ कान्होलीबारा यांना त्याचे राहते घरून ताब्यात घेतले. तसेच आरोपो क्रं. ५ नामे रामेश्वर सुखराम नागपुरे हा मौजा चिचोली येथे असल्याची माहीती मिळाल्याने पोलीस पथकाच्या मदतीने त्याला त्याचे राहत्या घरून ताब्यात घेऊन गोंदिया जिल्ह्यातील चोरी बाबत विचारपुस केली असता आरोपीतांनी विचारपूर येथील चोरी केल्याची कबुली दिली.

**आरोपीतांनी दिलेल्या कबुलीवरून खालील नमूद मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

१) एक जोड पिवळ्या धातूचे कानातील टॉप्स वजन अं.४ ग्रॅम कि. अं.४०,०००/- रू.

२) एक नग पिवळ्या धातूचे मंगळसुत्रातील पदक (डोरला) व.अं.२.५ ग्रॅम कि.अं.२५,०००/- रु.

३) १९ नग पिवळ्या धातुचे गोल मनि व.अं.३ प्रेम कि.अं.३०,०००/- रू.

४) एक जोड पांढ-या धातुची पैरपट्टी (पायल) व.अं.२०० ग्रॅम कि.नं.२५,०००/- रु.

५) रोख रक्कम २०,०००/- रूपये ज्यामध्ये २००/- रू. दराचे १०० भारतीय चलनी नोटा

असे एकुण १,४०,०००/- रूपयाचे मुद्देमाल जप्त करण्यात आले. पुढील तपासकामी आरोपीताना पोलीस स्टेशन सालेकसा येथे स्वाधीन करण्यात आले आहे.

सदरची कामगीरी श्री. गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, स्थानिक गुन्हे शाखा गोंदियाचे पोलीस निरीक्षक श्री पुरुषोत्तम अहेरकर यांचे मार्गदर्शना खाली सपोनि/धिरज राजुरकर सोबत, पोहवा विठ्ठलप्रसाद ठाकरे, पोहवा सुबोधकुमार बिसेन, पोहवा दुर्गेश तिवारी, पोहवा भोजराज बहेकार, पोशि हंसराज भांडारकर, पोशि दुर्गेश पाटील, मपोशि स्मिता तोंडरे, चापोहवा राधेश्याम कांबळे, चापोशि राम खंडारे स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया, यांनी केली आहे.

# नवीन दिवाणी न्यायाधीश इमारतीवरील दोन मजल्यांच्या प्रत्यक्ष कामाला होणार सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल येथील नवीन दिवाणी न्यायाधीश न्यायालयीन इमारतीवर दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या प्रत्यक्ष बांधकामाला लवकरच सुरुवात होणार असून यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष ऍड. पारिजात पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ऍड. मनोज भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पनवेल वकील संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे. या बांधकामासाठी १० कोटी १६ लाख ५७ हजार ८९४ रुपये खर्च केले जाणार आहेत. पनवेल मधील नवीन कोर्ट इमारतीवर दोन मजले बांधण्याकरिता निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती तसेच या संदर्भात त्यांनी व बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष ऍड. पारिजात पांडे आणि पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष एड. मनोज भुजबळ आणि सहकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्या प्रयत्नांना यश आले असून याचा वकील, पक्षकार, नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. पनवेल येथील नवीन इमारतीमध्ये सह दिवाणी न्यायालय व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पनवेल हे सहा कोर्ट तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर हे चार कोर्ट, जिल्हा व अति सत्र न्यायालय चार कोर्ट, तसेच पोस्को न्यायालय एक असे एकूण १५ न्यायालये आहेत. परंतु नवीन कोर्टामध्ये तळमजला अधिक एक मजला असे एकूण प्रत्यक्षात आठ कोर्ट हॉल असून त्यामध्ये सद्यस्थितीत दाटीवाटीने १५ कोर्ट कार्यान्वित असून सात न्यायालयांना रितसर कोर्ट हॉल उपलब्ध नाही. आणि त्याकरीता नवीन इमारतीमध्ये असलेली वकीलांची लायब्ररी तसेच कॅंटींगमध्ये सिव्हिल प्रीझोनमध्ये कोर्ट बसवण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली. पनवेल न्यायालयाकरिता मंजूर न्यायाधीश, वकील व न्यायालयात येणारे पक्षकार यांच्या तुलनेने सध्याची इमारत अपुरी पडत आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजासाठी येणाऱ्या सर्वांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल वकील संघटनेच्या सोबतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देत न्यायालय इमारतीवर दोन मजले बांधकामासाठी जास्तीत जास्त आर्थिक निधीची तरतूद करण्याची मागणी केली होती, त्यानुसार राज्य शासनाने या कामासाठी खर्चाच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानंतर या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा जाहीर होऊन सदरच्या कामाचा ठेका उल्हासनगर येथील रचना कंट्रक्शन या कंपनीला मिळाला आहे. आता या कामाची प्रत्यक्ष सुरुवात होणार असून एक वर्ष कालावधीत हे काम पूर्ण केले जाणार आहे. त्यामुळे दोन मजली विस्ताराचे काम मार्गी लागणार असून पनवेल परिसरातील न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ, सुटसुटीत व सर्वसमावेशक होणार आहे.

> पनवेल न्यायालयाच्या वाढत्या कामकाजाला न्याय देण्यासाठी अतिरिक्त मजल्यांची अत्यंत गरज होती. या कामाला येत्या महिन्यात सुरुवात होणार असून ते पनवेल वकील संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित आहे. आमदार प्रशांत ठाकूर आणि बार कौन्सिलचे अध्यक्ष ऍड. पारिजात पांडे यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे हा महत्त्वाचा टप्पा गाठता आला. दोन नवीन मजल्यांमुळे न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ, सुटसुटीत होणार असून वकील, न्यायाधीश आणि पक्षकारांना मोठा दिलासा मिळणार आहे.यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार प्रशांत ठाकूर, बार कौन्सिलचे अध्यक्ष ऍड. पारिजात पांडे, पनवेल वकील संघटनेचे सहकारी यांचे मनापासून आभार मानतो.
>
> - ऍड. मनोज भुजबळ,
> अध्यक्ष- पनवेल वकील संघटना

# समाज प्रबोधनाचा जागर: सत्यपाल महाराजांचा 'सप्त खंजिरी' प्रेरणादायी कार्यक्रम डोळंबावाडीत संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी :** क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे औचित्य साधून, डॉ.विष्णू उकंडे यांच्या पुढाकारातून व बिरसा मुंडा जयंती उत्सव समिती डोळंबा,डोळंबावाडी यांच्या वतीने प्रसिद्ध सप्त खंजिरी निर्माते आणि राष्ट्रीय प्रबोधनकार सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम डोळंबावाडी येथे उत्साहात पार पडला.

प्रभावी शैलीतून सामाजिक प्रबोधन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सर्व महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली . आर्णी व दिग्रस तालुक्यातील तथा अनेक गावातील आदिवासी सरपंच , ग्रामपंचायत सदस्य तथा विविध संघटना यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात, सत्यपाल




महाराजांनी आपल्या प्रभावी सप्त खंजिरी शैलीतून विविध सामाजिक विषयांवर श्रोत्यांचे प्रबोधन केले. महाराजांच्या ओजस्वी वाणीतून आणि खंजिरीच्या नाद धून्यातून व्यक्त झालेल्या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी पंधरा हजाराच्या वर जनसमुदाय उपस्थित होता तसेच डोळंबा वाडीच्या इतिहासात 1968 गाव स्थापनेपासून सर्वात जास्त जनसमुदाय जमा झाल्याचे नागरिकात चर्चा आहे. महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन नागरिकांनी कार्यक्रमाला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने,

हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला.या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. विष्णु उकंडे यांनी केलीतर सूत्रसंचालन खटारे सर यांनी केले .सदर कार्यक्रमाची सांगता वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची राष्ट्रवंदना "तन.. मन.. धन से सदा सुखी हो भारत देश हमारा" ने झाली.




# शिळ-डायघर पोलिस स्टेशन मधील पोलिसांची कैतुकास्पद कामगिरी

## महिलेचा खुन करून मृतदेह बॅगेत भरून देसाई खाडीमध्ये फेकणाऱ्या आरोपीस २४ तासाचे आत अटक

**दैनिक युवक आधार,**

**रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

**(ठाणे) :** देसाई गावचे खाडी पुलावरुन ट्रॉली बॅगेत आढळलेल्या मुलीच्या मृतदेहाचे गुढ उकळले असून घरातल्या भांडणावरुन आरोपीने गळा दाबून खून केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. सीसीटिव्ही फुटेजच्या आधारे आरोपीस २४ तासाच्या आत अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे.

अधिकृत सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार, पोलीसांना नियंत्रण कक्ष, ठाणे येथुन प्राप्त झालेल्या संदेशानुसार देसाई गाव कडुन कल्याणकडे जाणा-या रोडवर देसाई गावचे पुढील खाडी ब्रिजचे खाली एका बॅगेत अनोळखी महिलेचा मृतदेह असल्याबाबत माहिती मिळुन आली होती. या प्रकरणी बीट मार्शल २ वरील अंमलदार यांनी खात्री करुन पोलीस ठाण्यात माहिती कळविली. लगेचच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांचेसह पोलीस पथकाने सदर ठिकाणी भेट देवुन पाहणी केली असता तेथील खाडीच्या पाण्यातील मातीच्या भरावावर एक बॅग पडलेली दिसुन आली.



बॅगेत एका २० ते २५ वर्षे वयाच्या महिलेचे प्रेत पाय गुडघ्यात दुमडुन ट्रॉली बॅगत भरलेले व अर्धवट बाहेर आल्याचे दिसत होते. मयत महिलेचे अंगात नेसुस गुलाबी रंगाचा टॉप, त्यावर नक्षीदार फुलांची डिझाईन, त्याखाली लाल रंगाची लेगीन्स घातलेली होती. तिचे डावे हाताचे मनगटाजवळ P.V.S. असे इंग्रजीमध्ये गोंदलेले नाव होते. तसेच प्रेत फुगलेले व अर्धवट कुजलेले होते. सदर मयत महिलेचे नातेवाईक मिळाले नव्हते. तसेच हा गुन्हा शिळ डायघर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीताविरुध्द दाखल करण्यात आला होता.

पोलीसांनी वरिष्ठांच्या मागदर्शनाखाली शिळ-डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. श्रीराम पौळ यांनी मयताची ओळख पटवून आरोपीचा शोध तपासकामी अधिनस्त अधिकारी, अंमलदार यांचे चार तपास पथके तयार केले. गुन्हयाचा तपास चालू असताना सदर गुन्हयाच्या अनुषंगाने सोशल मिडीयावर प्रसारीत केलेल्या बातमीद्वारे एका साक्षीदाराकडून अपर पोलीस आयुक्त श्री. विनायक देशमुख, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे यांना प्राप्त उपयुक्त माहितीच्या आधारे अज्ञात आरोपीताबाबत सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या माध्यमातुन कसोशीने शोध घेतला. सदर गुन्हयात आरोपी विनोद श्रीनिवास विश्वकर्मा वय ५० वर्षे रा. ठि. देसाईगाव, ता. जि. ठाणे मुळगाव-गोरखपुर, उत्तरप्रदेश यास देसाई येथून ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास केला असता सदरचा गुन्हा त्यानेच केला असल्याची कबुली दिली आहे.

सदर गुन्हयातील मयत मुलगी प्रियांका विश्वकर्मा वय २२ वर्षे ही आरोपीसोबत मागील ०५ वर्षापासुन राहावयास होती. त्याच्यात दिनांक २१ नोव्हेंबर रोजी रात्रौ आपसात भांडण झाले होते. आरोपीत याने मयत महिलेचा गळा दाबुन खुन करुन पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने तिला ट्रॉली बॅगमध्ये भरुन ०१ दिवस रुममध्येच ठेवले होते. मयत महिलेच्या प्रेताची दुर्गंधी सुटल्यानंतर दिनांक २२ नोव्होहेंबर रोजी रात्रौ ११.३० ते १२.०० वा. चे दरम्यान प्रेत असलेली ट्रॉलीबॅग रोडने पायी चालत खाडी पुलाकडे घेवुन जावुन सदरची ट्रॉलीबॅग पुलावरुन खाली फेकुन दिली होती. मयत व आरोपीताबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसताना सोशल मिडीयामध्ये प्रसारीत झालेल्या बातमीच्या आधारे साक्षीदार मिळवून, हददीतील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शिळ डायघर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा कसोशीने तपास करुन सदर गुन्हयातील मयताची ओळख पटवून आरोपीस सदर गुन्हयात २४ तासात अटक करुन खुनाचा गंभीर स्वरूपाचा गुन्हा उघडकीस आणून स्तुत्य अशी कामगिरी केलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. सुभाषचंद्र बुरसे, पोलीस उप आयुक्त परि. १ ठाणे, श्री. प्रशांत कदम, पोलीस उप आयुक्त परि. ५ वागळे इस्टेट, श्रीमती प्रिया डमाळे सहा. पोलीस आयुक्त कळवा विभाग, श्री. श्रीराम पौळ, वपोनि शिळ-डायघर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) गजेंद्र राऊत, सपोनि. संतोष चव्हाण, सपोनि. अनिल राजपुत, सपोनि. योगश लामखडे, सपोनि. शहाजी शेळके, सपोनि. अमोल पोवार, पोउपनिरी. माने, पोउपनिरी. बेळगे, पोउपनिरी. तिडके, पोह. श्यामकुमार राठोड, पोह. हनुमंत मोरे, पोह. भरत जाधव, पोह. तेजस परब, पोह विश्वास मोटे, पोह. महेंद्र लिंगाळे, पोह. सचिन कोळी, पोह अजय साबळे, पोह. रमेश पाटील, पोह.विक्रांत कांबळे, पोना. मंदार यादव, पोना. महेंद्र पाटील, पोशि. संदीप बोरकर, पोशि. सुशिल पवार, पोशि. ललीत महाजन, पोशि. जयेश येळवे, पोशि. रत्नदिप चौधरी, पोशि. अक्षय पाडळे, पोशि. स्वप्निल सोनवलकर, पोशि.वाहीद तडवी, पोशि. विजय खाडे यांनी केली आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मुंबई शहरात उत्साहात संपन्न






**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी** : भारतीय संविधानात ७५ पर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सामाजिक न्याय विभागातर्फे घरघर संविधान या उपक्रमांतर्गत संविधान दिन मंबई येथील ऐतिहासिक चैत्यभुमी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास मुंबई शहरच्या जिल्हाधिकारी श्रीमती. आंचल गोयल, सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग श्री. एस. बागुल, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग श्री. बाळासाहेब सोळंकी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर श्री. रविकिरण पाटील चैत्यभुमी समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. नागसेन कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वा. संविधान दिनानिमीत्त परेल मुंबई येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या बी.आय.टी चाळीमध्ये अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे सिद्धीविनायक मंदिर दादर ते चैत्यभुमी या दरम्यान संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत मुंबई शहर व उपनगर येथील महाविद्यालयीन विद्यार्थी / विद्यार्थीनी सहभागी झाले होते.

त्यानंतर चैत्यभुमी दादर येथे मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती. आंचल गोयल, सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग श्री. एस. बागुल, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग श्री. बाळासाहेब सोळंकी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर श्री. रविकिरण पाटील चैत्यभुमी समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. नागसेन कांबळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

त्यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या योजनांच्या चित्ररथाचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमात संविधान दिनाचे औचित्य साधुन मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील समाजभुषण प्राप्त पुरस्कारथींना प्रातिनिधीक स्वरुपात संविधानाची प्रत देऊन सन्मानीत करण्यात आले.या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, नागरिक, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उरण –कोटनाका–काळाधोंडा रस्त्याच्या कामामुळे प्रवासी नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : उरण कोट नाका ते काळा धोंडा हा रस्ता रेल्वे सेवा सुरू झाल्यापासून वाहतुकीसाठी महत्वाचा रस्ता आहे.आणि आता रस्त्याचे बांधकाम विभागामार्फत रुंदीकरण आणि डांबरीकरणाचे काम सुरू आहे. परंतु नियोजनाचा अभाव आणि कामाचा मंद वेग यामुळे रस्त्यावरील खड्डे, जागोजागी उखडलेले भाग,मातीचे ढिगारे, उंच खोल पृष्ठभाग त्यामुळे या सर्वांचा परिणाम वहातुकीवर होत आहे.



रस्त्याच्या कामासाठी खोदकामाचे खड्डे,मातीचे ढिगारे,दगड,रस्त्यावर आल्याने वहानचालकास वेग कमी करावा लागत आहे. दिशादर्शक मिळण्यासाठी अडथळा, ओव्हरटेक, सातत्याने ब्रेक लावताना गाडी चालविण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत.


५० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर उरण रेल्वे सेवा चालू झाली आहे खरी पण मर्यादित लोकल फेऱ्या,या समस्या सोबतच संपूर्ण उरण कोट नाका काळा धोंडा हा रेल्वे स्टेशन कडे जाणारा रोड हि अंधार नगरी आहे.या रोडवर अपुरी प्रकाशयोजना आहे. त्यात रस्ता बांधकामाचा अडथळा,काम चालू झाल्यापासून छोटेमोठे अपघातांची संख्या वाढत आहे.दिवसेंदिवस या मुख्य रस्त्यावर वहानांची प्रवासी, विद्यार्थी, चाकरमानी,यांची संख्या वाढतच आहे स्टेशनपासून येजा करण्यासाठी पर्यायी मार्ग ही उपलब्ध नाही.एकाच रस्त्यावर या सर्वाचा भार पडत आहे. रस्त्याचे रुंदीकरण, व डांबरीकरण कधी पुर्ण होईल याचा नेमका तपशील उपलब्ध नाही. सकाळी आणि संध्याकाळी या मार्गावर गाड्यांच्या व प्रवाशांच्या वर्दळीमुळे वहातुक कोंडी होत आहे. वहातुक पोलीस याकरता सहकार्य करीत आहेतच परंतु तरीही नागरिकांची गैरसोय होत आहे.

कोट नाका काळा धोंडा परिसरातील नागरिक,व रोज येजा करणारे उरणवासी या गैरसोयीविषयी संबंधित विभागाचे लक्ष केंद्रित करून घेत आहेत, रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत आहेत पण तरीही रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण हे काम त्वरित पूर्ण झाले नाही तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी व जीवीत हानी टाळण्यासाठी उपाययोजना अंमलात आणल्या नाही तर हि प्रवासी नागरिकां साठी चिंतेची बाब आहे. असे बोलले जात आहे.

## श्री.केशवराज बाबासाहेब महाराज यात्रा महोत्सवाला उद्यापासून सुरुवात; श्रीमद भागवत कथा,कीर्तन,ओवीबद्ध चरित्राचे सामुदायिक पठण

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : शहराचे ग्रामदैवत तथा शिर्डीचे संत साईबाबा यांचे सदगुरु श्री.गोपालकृष्ण केशवराज बाबासाहेब महाराज(व्यंकुशाह) यांच्या यात्रा महोत्सवास उद्यापासून(ता.२७)प्रारंभ होत आहे.शुक्रवारी(ता.५)डिसेंबर रोजी महोत्सवाची सांगता होणार आहे.यानिमित्ताने श्री. केशवराज बाबासाहेब महाराज मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री.नंदकुमार गोंदीकर महाराजांच्या रसाळ वाणीतून श्रीमद भागवत कथेस उद्यापासून प्रारंभ होत आहे.सकाळी ९ ते १० संहिता वाचन,दुपारी १२ ते ५ कथेचे निरूपण.ह.भ.प.श्री. शाळीग्राम मुळे(उमापूर)यांचे गुरुवार व शुक्रवार रात्री नऊ वाजता कीर्तन होणार आहे.शनिवारी (ता.२९) रविवारी (ता.३०)रोजी कीर्तनचंद्रिका दीपाली कुलकर्णी यांचे रात्री नऊ वाजता कीर्तन होणार आहे.

मार्गशीर्ष शुद्ध ११शके १९४७ सोमवारी (ता.१) डिसेंबर रोजी श्री.गीता जयंती ,श्री.केशवराज बाबासाहेब महाराज(व्यंकुशाह) यांच्या पुण्यतिथीनिमित्त सकाळी ७ ते ९ या वेळेत श्री.केशवराज बाबासाहेब महाराजांच्या ओवीबद्ध चरित्राचे सामुदायिक पठण (तीन पाठ)होणार आहेत. तसेचसकाळी ९ वाजता श्रीमद भागवत गीतेचे संपूर्ण अठरा अध्याय पठण,सायंकाळी 'श्रीं' ची आराधना अभिषेक व महापूजा होणार आहे.रात्री ९ वाजता ह.भ.प.बालासाहेब नेब यांचे 'श्रीं' च्या चरित्रावर रात्री नऊ वाजता सुश्राव्य कीर्तन होणार आहे.मंगळवारी (ता.२) रोजी दीपाली कुलकर्णी यांचे रात्री नऊ वाजता कीर्तन होणार आहे. बुधवारी (ता.३) डिसेंबर रोजी रात्री नऊ वाजता ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज वालुरकर (फडकरी) यांचे हरिकीर्तन होणार आहे.सदर महोत्सवात लघुरुद्र अभिषेक करू इच्छिणाऱ्यांनी सुधीर मंडलिक यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संयोजकातर्फे करण्यात आले आहे.

**-'श्रीं' ची भव्य पालखी मिरवणूक**

गुरुवारी (ता.४) डिसेंबर रोजी श्री.केशवराज बाबासाहेब महाराज (व्यंकुशाह)यांच्या यात्रेचा मुख्य दिवस आहे त्यानिमित्त दुपारी १२ वाजता 'श्रीं' ची महाआरती ,दुपारी ३ वाजता 'श्रीं' ची भव्य पालखी मिरवणूक निघणार आहे.शुक्रवारी(ता.५) डिसेंबर रोजी ह.भ.प.सुनील महाराज आष्टीकर यांचे काल्याचे कीर्तन दुपारी ४ वाजता होणार आहे..महोत्सवातील धार्मिक कार्यक्रमासाठी शहरासह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केशव मंडलिक,वामन मंडलिक,पुरुषोत्तम मंडलिक यांनी केले आहे.

## संविधान दिनानिमित्त मुरुड पोलीस स्टेशन तर्फे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**लातूर/ मोहम्मद पिंजारी** : संविधान दिनानिमित्त तसेच 26/11 मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांच्या स्मरणार्थ मुरुड पोलीस स्टेशनतर्फे आज भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय भावना, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडवणाऱ्या या उपक्रमाला नागरिक, पोलीस कर्मचारी आणि विविध सामाजिक संस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थिती लावली



या शिबिरात एकूण 51 रक्तदात्यांनी रक्तदान करत समाजपुढे प्रेरणादायी उदाहरण ठेवले. एपीआय अशोक उजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी, कर्मचारी, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवी संस्थांनी सहभाग घेत शिबिर अधिक प्रभावी आणि शिस्तबद्धरीत्या पार पाडले. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना शहीद जवानांच्या बलिदानाची आठवण करून देण्यात आली. "26/11 हल्ल्यात राष्ट्रासाठी आपले प्राण अर्पण केलेल्या वीरांचा पराक्रम भारतीयांच्या हृदयात सदैव जिवंत राहील," असे एपीआय अशोक उजगीरे यांनी सांगत रक्तदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असल्याचेही नमूद केले.

शिबिराची सांगता शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून आणि संविधान मूल्यांचे पालन करण्याची सामूहिक शपथ घेत भावनिक वातावरणात करण्यात आली.

## हिवाळ्यातील सांधेदुखी टाळण्यासाठी अशी घ्या काळजी – डॉ. आयुष शर्मा, ऑर्थोपेडिक स्पाइन सर्जन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जसजसा हिवाळा सुरू होतो आणि तसतसे बाहेरचे तापमान कमी कमी होत जाते. थंडीमुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि सांध्यांना रक्तपुरवठा कमी होतो. यामुळे सांधे आखडतात आणि वेदना वाढतात. स्नायूंचा कडकपणा आणि चुकीच्या शारीरीक स्थितीमुळे हाडांवर ताण येतो आणि सांधेदुखी होऊ शकते.हिवाळा आला की श्वसन किंवा त्वचेच्या समस्यांमध्ये मोठ्या संख्येने वाढ होते मात्र या हवामानामुळे सांधे आणि हाडांच्या वेदनांमध्ये देखील वाढ होऊ शकते. गुडघे आणि कंबर, खांदे आणि मणके थंड हवामानामुळे अस्वस्थता निर्माण करतात आणि एखाद्या व्यक्तीच्या जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम करतात. थंडीमुळे सांध्याभोवतीचे स्नायू आणि मऊ ऊती घट्ट होतात आणि स्नायुंची लवचिकता गमावतात, ज्यामुळे सामान्य हालचाली दरम्यान हाडं आणि सांध्यावरील भार वाढतो. जेव्हा वातावरणाचा दाब कमी होतो, तेव्हा शरीरातील



पेशी आणि सांध्यांमध्ये दाब वाढतो, ज्यामुळे वेदना होऊ शकते. लोक बराच वेळ घरात असतात, जास्त वेळ बसून राहतात किंवा चुकीच्या शारीरीक स्थितीमुळे सांधे आणि मणक्यावर दबाव येऊ शकतो. थंड हवामानात कमी शारीरिक हालचालीमुळे सांध्यांना आधार देणारे स्नायू कमकुवत होतात, उभे राहताना, चालताना, वळताना किंवा उचलताना वेदना होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच, हिवाळ्यात आरोग्याची अत्यंत काळजी घेणे गरजेचे आहे.

**या टिप्सचे पालन करा:**

हिवाळ्यात प्रत्येकाने त्यांच्या हाडांच्या आणि सांध्याच्या आरोग्याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे.सांध्याभोवतालचे स्नायूंचे आकुंचन टाळण्यासाठी तसेच शरीराला ऊब मिळावी याकरिता संपुर्ण शरीर झाकणारे कपडे घाला. स्नायूंना आराम मिळावा तसेच रक्ताभिसरण सुधारण्यासाठी गरम पाण्याने आंघोळ करा. योग्य शारीरीक स्थिती बाळगा, जास्त वेळ उभे राहणे किंवा बाक काढुन बसणे टाळा. जर तुम्ही बराच वेळ एकाच ठिकाणी बसत असाल तर दर 30 ते 60 मिनिटांनी काही वेळ उभे राहा किंवा चालण्याचा प्रयत्न करा. स्नायू मजबूत राहवे यासाठी हलके स्ट्रेचिंग, योगा किंवा चालणे यासारखे व्यायाम करून सक्रिय राहण्याचा प्रयत्न करा. भरपुर पाणी प्या सर्व महत्वाच्या पोषक तत्वांसह संतुलित आहाराचे सेवन करा कारण असे केल्याने स्नायूंच्या चयापचनास चालना मिळते आणि सांध्याभोवती योणारी सूज टाळण्यास मदत होते. जर तुम्हाला आधीच संधिवात किंवा स्पाइनल स्पॉन्डिलायसिस सारखे आजार असतील, तर हॉट-पॅक थेरपीमुळे स्नायूंचा कडकपणा आणि अस्वस्थपणा दूर करता येईल.

## केवळ निधी आणणाराच नव्हे, तर खर्च करता येणारा नगराध्यक्ष हवा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर** : रिसोड यावा यासाठी सुद्धा राजकीय समान संधी आहे मतदार नगर परिषद निवडणूक 2025 इच्छाशक्ती आवश्यक आहे. कोणाच्या बाजूने मतदान करिता येत्या दोन डिसेंबरला नगराध्यक्ष पदासाठी भारतीय करायचे यासाठी राजकीय आघाडी मतदान होणार आहे जसजशी जनता पार्टी शिवसेना मतदानाची तारीख जवळ येत भगवानराव राजकीय महाविकास होत शिवसेनाचे उबाठा चे की देशमुख, आहे तसतसे वातावरण गरम आहे. निवडणूक आली वंचित युतीचे परिस्थिती व उमेदवाराची शिरसागर, राजकीय इच्छाशक्ती यावर लक्ष कडून ठेऊन आहे. 2 डिसेंबर ला केलेले सुधाकर मतदान पुढील पाच वर्षाच्या बहुजन शहराच्या विकासासाठी विकासाच्या मोठमोठ्या गप्पा आघाडीचे शेख सलीमभाई, एम उपयोगी ठरणार आहे. सर्वच मारल्या जातात प्रत्यक्षात मात्र आय एम चे तसलीम भाई राजकीय पक्ष उमेदवार तशी कामे होत नाहीत आश्वासन आणि अपक्ष म्हणून अड सतीश यांच्याकडून निधी खेचून आणून देणारे नेते व नगरसेवक पुन्हा पंडित ही निवडणूक





लढवीत विकास करण्याची आश्वासन दिलेल्या कामाकडे, शब्दाकडे आहेत. निवडणुकीचे वातावरण मतदारांना देत आहेत. निधी सोयीस्करपणे पाठ फिरवतात पाहता तिरंगी लढत होईल अशी कुठून आणायचा? हे जेवढे आणि फक्त वेळ काढू धोरण राजकीय वर्तुळात चर्चा आहे महत्त्वाचे आहे तेवढेच निधी कुठे अवलंबून स्व-विकास साधतात. महाविकास आघाडी आणि आणलेला शहराच्या विकासासाठी विविध महायुती यांच्यात सरळ लढत वापरायचा, कसा वापरायचा, योजने अंतर्गत भरमसाठ निधी होईल असे वाटत असताना कशासाठी वापरायचा याची राज्य शासनाकडून दिला जातो वंचित बहुजन आघाडी कडून समज असणे तेवढेच महत्त्वाचे परंतु आलेला निधी बऱ्याचदा सलीम भाई यांची आकस्मिक आहे. विकासकामांचा नियमाप्रमाणे कुठे आणि कसा झालेली एन्ट्री सर्व राजकीय प्रधान्यक्रम ठरवून तो साधता खर्च करावा याच साध गणित समीकरणे बिघडवून टाकणारी आला पाहिजे म्हणून रिसोड सुद्धा नगरसेवक व नगर अध्यक्ष ठरली आहे. आता तिरंगी शहराचा भावी नगराध्यक्ष हा यांना जुळत आणि कळतसुद्धा लढतीचे चिन्ह असून तिन्ही केवळ निधी आणण्यापुरताच न नाही. आलेला निधी खर्च करता उमेदवारांना निवडून येण्याची राहता आणलेला निधी.

## कार्यालय ग्रामपंचायत, भेंडवी

पंचायत समिती, राजुरा | जिल्हा परिषद, चंद्रपूर

**निविदा सूचना क्र. २ सन २०२५–२६ दि. १६.०६.२०२५**

ग्रामपंचायत भेंडवी कडून सन २०२५–२६ या आर्थीक वर्षात खालील प्रमाणे योजनानिहाय कामाकरिता द्वीलिफाफा पद्धतीने (B-1 TENDER) द्वारा इच्छुक जिल्हा परिषद, चंद्रपूर तथा सा.बां.वि.चंद्रपूर यांचे कडील पंजीबद्ध यथायोग्य श्रेणीतील कंत्राटदाराकडून निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.क्र | योजनेचे नांव | बांधकामाचे तपशिल | अंदाजपत्रकीय किंमत (प्रपत्र ब नुसार) | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र फी | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य फंड (१५%मागास कल्याण) | मौजा भेंडवी येथे चंद्रय्या फंदी यांचे शेत ते गडचांदूर रस्ता पर्यंत सिमेन्ट काँक्रीट रस्ता बांधकाम | ८,५०,०००/– | ८५००/– | १०००/– | ०६ महिने |
| २ | सामान्य फंड (१५%मागास कल्याण) | मौजा भेंडवी येथे फंदी यांचे शेत ते गडचांदूर रस्ता पर्यंत सिमेन्ट काँक्रीट नाली बांधकाम | २,३४,०१७/– | २४००/– | ५००/– | ०६ महिने |
| ३ | सामान्य फंड (ग्रामनिधी) | मौजा भेंडवी जि.प. शाळा शौचालय व सेग्रीकेशन शेडला टाईल्स लावणे | २,३०,६५१/– | २४००/– | ५००/– | ०६ महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती :–**

१) वरील प्रमाणे कामाच्या निविदा द्वी लिफाफा पद्धतीने दि. १६.०६.२०२५ ते २३.०६.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येईल.
२) वरिल प्रमाणे कामाच्या निविदा दि. २४.०६.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्यानुसार उघडण्यात येईल.
३) निविदा फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयातून घ्यावे लागेल व निविदा सादर करतांनी कंत्राटदारांनी त्यांचे संपूर्ण कागदपत्रे उदा. कंत्राटदार पंजीयन प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी प्रमाणपत्र, इन्कम टॅक्स व जीएसटी क्लीयरंस प्रमाणपत्रे जोडणे अनिवार्य राहील.
४) निविदेची अनामत रक्कम डी.डी. किंवा चेक स्वरुपात स्विकारण्यात येईल.
५) मुल्यांकन नुसार सर्व प्रकारच्या शासकीय कर कपाती करुनच अंतिम देयक देण्यात येईल.
६) कुठलेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत भेंडवी ने राखून ठेवले आहेत.
७) निविदेच्या अटी व शर्ती व सविस्तर माहिती ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.

## कार्यालय ग्रामपंचायत, भेंडवी

पंचायत समिती, राजुरा | जिल्हा परिषद, चंद्रपूर

**निविदा सूचना क्र. १ सन २०२४–२५ दि. १३.०२.२०२५**

ग्रामपंचायत भेंडवी कडून सन २०२५–२६ या आर्थीक वर्षात खालील प्रमाणे योजनानिहाय कामाकरिता द्वीलिफाफा पद्धतीने (B-1 TENDER) द्वारा इच्छुक जिल्हा परिषद, चंद्रपूर तथा सा.बां.वि.चंद्रपूर यांचे कडील पंजीबद्ध यथायोग्य श्रेणीतील कंत्राटदाराकडून निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.क्र | योजनेचे नांव | बांधकामाचे तपशिल | अंदाजपत्रकीय किंमत (प्रपत्र ब नुसार) | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र फी | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य फंड (ग्रामनिधी) | मौजा लाईनगुडा येथे आदिवासी सिम्बॉल समेर पेपर ब्लॉक बांधकाम करणे | ३,८८५४५/– | ३९००/– | ५००/– | ०३ महिने |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

**निविदेच्या अटी व शर्ती :–**

१) वरील प्रमाणे कामाच्या निविदा द्वी लिफाफा पद्धतीने दि. १३.०३.२०२५ ते २०.०३.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येईल.
२) वरिल प्रमाणे कामाच्या निविदा दि. २१.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्यानुसार उघडण्यात येईल.
३) निविदा फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयातून घ्यावे लागेल व निविदा सादर करतांनी कंत्राटदारांनी त्यांचे संपूर्ण कागदपत्रे उदा. कंत्राटदार पंजीयन प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी प्रमाणपत्र, इन्कम टॅक्स व जीएसटी क्लीयरंस प्रमाणपत्रे जोडणे अनिवार्य राहील.
४) निविदेची अनामत रक्कम डी.डी. किंवा चेक स्वरुपात स्विकारण्यात येईल.
५) मुल्यांकन नुसार सर्व प्रकारच्या शासकीय कर कपाती करुनच अंतिम देयक देण्यात येईल.
६) कुठलेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायत भेंडवी ने राखून ठेवले आहेत.
७) निविदेच्या अटी व शर्ती व सविस्तर माहिती ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.

## निफाड तालुक्यातील मुलींची राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**विनोद गायकवाड**

**उत्तर महाराष्ट्र संपादक**

**निफाड:-** येथील शिवज्ञान दर्शन शिक्षण प्रतिष्ठान संचलित विस्डम इंटरनॅशनल स्कूल अँड आचिव्हर्स ज्युनिअर कॉलेज निफाड, येथील मुलींच्या कबड्डी संघाने.राज्य पातळी नंतर राष्ट्रीय स्तरावरही आपला ठसा उमटवला आहे.

नाशिक विभागीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या या संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत कास्य पदक मिळवीले असून विद्यालयातील कु. निकीता शंकर कवडे हिची हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या १९ वर्षांखालील राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.






तसेच विद्यालयातील कु. कावेरी प्रकाश पगार व कु. सेजल राजेश काकडे यांची ५२व्या राष्ट्रीय कुमारी अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून पुणे येथे चालू असलेले राज्यस्तरीय कुमार व कुमारी स्पर्धेसाठी

- कु. आरती दत्तात्रेय घोटेकर
- कु. सायली हिरामण खताळे
- कु. अन्वी विलास नागरे
- कु. सिद्धिका सोन्याबापू गंभीरे
- कु. वैष्णवी बद्रीनाथ गंभीरे

याची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली. निफाड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.या सर्व विद्यार्थिनींनी कठोर परिश्रम, मैदानावरील जिद्द आणि उत्कृष्ट खेळकौशल्याच्या जोरावर हे यश संपादन केले असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेच्या आणि विद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून पुढील वाटचालीस... हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## थोडक्यात

### शास्त्री विद्यालयात संविधान जनजागृती पथनाट्याने वेधले लक्ष...



**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : परतूर येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात बुधवारी (दि. 26) भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.दरम्यान,यानिमित्त काढण्यात आलेल्या संविधान जनजागृतीत फेरीत मुलींनी सादर केलेल्या संविधान जनजागृती पथनाट्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.विद्यालयात विविध कार्यक्रमही घेण्यात आले.यानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले.संविधान विषयावर आधारित निबंध, चित्रकला तसेच वक्तृव स्पर्धा घेण्यात आली. या सर्व स्पर्धामध्ये विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी मुख्याध्यापक एल. के. बिरादार, पर्यवेक्षक आर. टी. राऊत, टी. जी. घुगे यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### अनसिंग पोलिसांची हातभट्टी दारू विक्रेत्यांवर धडक कार्यवाही



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील** : अनसिंग पोलीस स्टेशन हद्दीमध्ये ग्राम कृष्णा येथे हातभट्टी दारू गाळून विक्री करणारा अटल हातभट्टी दारू विक्रेता शालिग्राम ज्योतीराम राठोड अंदाजे 48 वर्ष रा.कृष्णा ता. वाशिम याला अनसिंग पोलीस स्टेशननी M.P.D.A. कायद्याच्या कलम 3 (1) अन्वये कडक कार्यवाही करून मा. जिल्हादंडाधिकारी साहेबांचे आदेशाने दि.22/11/2025 रोजी एक वर्षाकरिता वाशिम जिल्हा कार्यालय येथे स्थानबद्ध केले आहे. त्यामुळे सदर कार्यवाहीमुळे अनसिंग पोलीस स्टेशन परिसरातील परिसरातील दारू विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सदरची कार्यवाही महा पोलिस अधीक्षक अनुज तारे साहेब, मा. अप्पर पोलीस अधीक्षक लता फड मॅडम, मा. उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल क्षीरसागर साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोनी प्रदीप परदेशी स्थागुशा ,पोनी अमर चोरे ठाणेदार पो स्टे. अनसिंग सपोनी राहुल शेजव ,पोहवा जगन्नाथ खंदारे, पोहवा अजय जायभाये ,पोलीस अमंलदार विजय नागरे, अरुण गवई यांनी पार पाडली.

### संविधान दिन उत्साहात साजरा सामाजिक कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती



**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड** : देशाच्या लोकशाहीचा पाया असलेल्या भारतीय संविधानाची जाणीव जनमानसात दृढ करण्यासाठी दरवर्षी २६ नोव्हेंबरला साजरा केला जाणारा संविधान दिन यंदाही उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शहरातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून संविधानातील मूल्यांचा पुन्हा एकदा स्मरण केला.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अमोल भाऊ चौदंते, नागराज चौदंते, राहुल चौदंते, बालाजी कोलते, सचिन चौदंते, सुरज चौदंते, शिलवंत डोंगरे व सौरभ चौदंते यांची विशेष उपस्थिती लाभली. सर्वांनी मिळून संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले तसेच समाजात बंधुभाव, समानता, न्याय आणि स्वातंत्र्य या संविधानिक मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात वक्त्यांनी संविधानाचा इतिहास, त्यातील प्रमुख तरतुदी आणि आधुनिक भारताच्या विकासात त्याचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. उपस्थित नागरिकांनीही संविधानाच्या रक्षणासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा तालुका तळा शाखेची संयुक्त सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तळा (प्रमोद तरळ) :** शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ रोजी शाखेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शाखा अध्यक्ष श्री यशवंत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सायं ठिक. ६.००. वाजता..संघ कार्यालय परेल मुंबई येथे संघ सचिव व शाखा निरीक्षक सन्माननीय श्री प्रमोद खेराडे साहेब यांच्या निरीक्षणाखाली व संघाचे पदाधिकारी श्री हरिश्चंद्र म्हातले,श्री जनार्दन शिगवण,श्री अशोक करंजे ,श्री कृष्णा सुर्वे, श्री सुरेश कावणकर, श्री सचिन कदम तसेच शाखेचे उपाध्यक्ष श्री दिनेश रामाने,श्री नथूराम घाग , श्री सुनिल जाधव, श्री सुभाष पिंगळे , खजिनदार श्री सुभाष भोकटे,सहखजिनदार श्री पांडुरंग शेडगे,ग्रामीण शाखेचे सचिव श्री गणेश राणे सन्मा. श्री रवीशेठ मांडवकर, खजिनदार श्री भानू मंचेकर गुरुजी, व सर्व पदाधिकारी, युवा अध्यक्ष विजय घाडगे, खजिनदार भरत नाडकर शाखा सहसचिव श्री लक्ष्मण अडखळे ,श्री नामदेव मोरे ,श्री भालचंद्र मोंडे ,श्री हेमंत पाष्टे , संघ युवा मंडळ उपाध्यक्ष ॲड महेश आंबवले सर, संघ महिला मंडळ सचिव सौ.प्रतीक्षा रोहन निवाते ,विवाह मंडळ उपाध्यक्ष श्री गणेश निवाते ग्रामीण ,गृप अध्यक्ष नरेंद्र लोखंडे, सचिव राम सावंत,जेष्ठ समाज बांधव महादेव आर्डे, परशुराम खांडेकर गणेश तांदळेकर,यांच्या ,प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. सदर सभेला,





शाखेचे कार्यकारणी सदस्य श्री विनय धाडवे, श्री राम चाळके , विश्वनाथ पवार ,गजानन तलार , श्री सुरेश पारावे,गणेश बोडेरे,श्री कृष्णा कातुर्डे ,श्री दगडू कदम , मंगेश भऊड ,श्री केशव भोसले , गणेश ठमके,विठोबा वाघमारे, सुर्यकांत भऊड , अंनत गिजे तसेच शाखेचे व युवक मंडळाचे पदाधिकारी यांच मौलिक सहकार्य लाभलेवार्षिक सभा चालू दिवसात असून देखील ग्रामस्थ मंडळाच्या वतीने अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रथमतः सरचिटणीस सुनील जाईलकर यांनी सर्वांचे स्वागत करुन अहवाल वर्षात मृत्यू पावलेल्या ज्ञात अज्ञात समाज बंधू भगिनींना श्रद्धांजली अर्पण करुन सभेला सुरुवात झाली. सभेची नोटीस वाचून झाल्यावर उपाध्यक्ष श्री सुनिल जाधव यांनी काही उदाहरण देऊन उपस्थित सर्वांचे लक्ष वेधून शाखेच्या कार्याची प्रास्ताविक रुपात अत्यंत महत्वपूर्ण माहिती दिली.खजिनदार श्री सुभाष भोकटे साहेब यांनी जमाखर्च अत्यंत उत्तम प्रकारे सभागृहासमोर सादर केला. उपाध्यक्ष श्री दिनेश रामाने यांनी सभागृहाला अहवान करुन कुणबी दिनदर्शिकेमध्ये आपण आपल्या गावाची व कार्यक्रमांची जाहिरात द्यावी, व कुणबी दिनदर्शिका गावातील प्रत्येक घरा घरात लागली पाहिजे,असे अहवान केले.

उपाध्यक्ष श्री गणेश निवाते यांनी विवाह मंडळाच्या कामकाजाची योग्य ती माहिती देऊन लग्न जुळविण्यासाठी योग्य ते सहकार्य मिळेल असे सांगितले. सचिव सौ. प्रतीक्षा रोहन निवाते यांनी ग्रामस्थांना अहवान केले की ,आपल्या शाखेच्या अधिपत्याखाली कुणबी समाजाचे महिला मंडळ स्थापन करायचे आहे त्यासाठी आपण सर्वांनी प्रत्येक गावातून दोन दोन महिलांची नावे द्यावी, असे अहवान केले.मुंबई शाखेचा इतिवृत्त सुनील जाईकर तर,जमाखर्च अहवाल खजिनदार सुभाष भोकटे, ग्रामीण समितीचा जमाखर्च भानू मंचेकर गुरुजी, युवाचा जमा खर्च भरत नाडकर यांनी सादर केला. सभाग्रहातून जमाखर्च तसेच कार्य अहवालात विठोबा भवूड कृष्णा खांडेकर, नितीन चालके नथुराम घाग यांनी काही सुचना करुन जमाखर्च आणि संपूर्ण कार्य हवालास सभागृहाच्या वतीने मंजूरी दिली. या नंतर युवा अध्यक्ष विजय घाडगे यांनी युवाच्यां विविध अंगाच्या कामकाजाची माहिती दिली. तसेच रवि शेठ मांडवकर यांनी समाजाच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करुन पुढील वाटचालीस अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले भविष्यात समाजाच्या अस्मितेसाठी आपण सर्वांनी मिळून एकत्र येऊन विचार केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

त्यांनतर ग्रामीण सचिव यांनी सुद्धा महत्वाच्या सुचना केल्या. संघ का. सदस्य श्री हरिश्चंद्र म्हातले यांनी आपले मत व्यक्त केले.तदनंतर संघ निरीक्षक प्रमोद खेराडे साहेब यांनी सर्व विषयांची योग्य ती नोंद घेऊन संघाच्या कामकाजाची माहिती दिली तसेच शाखेला भेडसावणाऱ्या समस्या संघाच्या सभेत मांडून योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु असं सांगून सभेच्या कामकाजाच कौतुक केले.

समारोपाच्या मनोगतात शाखा अध्यक्ष यशवंत शिंदे यांनी प्रथम महामानव व समाज नेत्यांच स्मरण करुन उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करुन ग्रामस्थ मंडळ आणि समाज बंधू भगिनींनी हेच या संघटनेचे आधारस्तंभ आहेत असं मत व्यक्त केले. मुंबई तसेच मुख्य संघटनेच्या धेय्य धोरणास अनुसरून ग्रामीण पदाधिकारी व युवा यांच्या वतीने चाललेल्या समाज उन्नती व विकास कामकाजाची उपस्थितीतांना माहिती देऊन तालुक्यातील तमाम सामान्य माणसाला शेतकऱ्यांना बहूजन समाजाला अनेक समस्या भेडसावत आहेत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत याबद्दलची दखल आपल्या कडून घेण्याचे कसोशीने प्रयत्न केले जात आहेत या बद्दल शाखा पदाधिकारी तसेच युवा सहकाऱ्यांचे कौतुक केले. तसेच शाखेचे पुढील कामकाज अजूनही चांगल्याप्रकारे केलं जाईल तसेच सभागृहातून व मान्यवरांच्या आलेल्या सुचनांचा भविष्यात योग्य विचार केला जाईल अशी ग्वाही दिली व सर्वांचे ऋण व्यक्त केले. या वार्षिक सर्व साधारण सभेला ग्रामीण सहकारी व गावातील अनेक पदाधिकारी यांनी यासभेस आवर्जून उपस्थित दाखवली होती .

या सभेमध्ये अनेक मान्यवरांनी अत्यंत महत्वपूर्ण मार्गदर्शन केले हेच या सभेचे मुख्य वैशिष्ट्य होते.या सभेला शाखेचे,संघाचे, युवक मंडळाचे,गाव प्रतिनिधी पदाधिकारी, तसेच ग्रामस्थ मंडळाचे सन्मा. अध्यक्ष.सचिव, पदाधिकारी २५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेस उपस्थित राहून सहकार्य केल्या बद्दल जाईलकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त करुन राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली..

## किल्ले रायगडावर निसर्गप्रेमी संस्थेची भव्य स्वच्छता मोहीम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/ प्रतिनिधी** : दिनांक 25 नोव्हेंबर 2025 रोजी नवी मुंबई येथील निसर्गप्रेमी संस्था अध्यक्ष श्री. सुनील कर्पे सर यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक किल्ले रायगड येथे भव्य स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली.

मोहीमेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र चरणी मानाचा मुजरा करून करण्यात आली. गडस्वच्छतेच्या माध्यमातून शिवरायांच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करण्याची संधी मिळाल्याने सर्व स्वयंसेवकांनी आनंद व्यक्त केला. “छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडावर सेवा करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी भाग्याची गोष्ट आहे,” असे संस्थेचे अध्यक्ष श्री. सुनील कर्पे यांनी सांगितले.

या स्वच्छता मोहिमेत संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक उत्साहाने सहभागी झाले. त्यामध्ये प्रमुख उपस्थिती—श्री. सुनील कर्पे सर (अध्यक्ष), श्री. रविंद्र



पाटील सर, श्री. पंकज कुमार पाटील सर, श्री. लोंढे वैभव सर, श्री. सोळुंके जितेंद्र सर, श्री. इंगळे चंद्रकांत सर, श्री. राजपूत महेंद्र सर, श्री. बेलदार रामेश्वर सर तसेच तरुण स्वयंसेवकांमध्ये कुणाल पाटील, आदित्य उपादे, नील सोनावणे, शिवानी जगताप, रिया शिंदे, अपूर्वा वाघमारे, प्रक्षिक गोतपगार, ओम वाघ, राजमाला वाकचौरे, प्रियांका भंडारे, गिरीजा पाटील, केसर चव्हाण हे सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छता मोहिमेद्वारे गडाच्या संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत निसर्गप्रेमी संस्थेने सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले.

## भारतीय संविधान दिन पंचायत समिती कार्यालय सिल्लोड येथे मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-**दिनांक 26 नोव्हेंबर 2025 रोजी पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड येथे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,छत्रपती संभाजीनगर अंकित व मा.गटविकास अधिकारी वर्ग एक पंचायत समिती, सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती कार्यालय सिल्लोड सभागृह येथे 26 नोव्हेंबर 2025 हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट समन्वयक स्वच्छ भारत मिशन कक्ष (ग्रामीण) पंचायत समिती, सिल्लोड केशवकांत बुलबुले यांनी केले तर बालविकास प्रकल्प अधिकारी सुनिता सनान्से, कृषी अधिकारी (विघयो) पंचायत समिती सिल्लोड सुनील सूर्यवंशी यांच्या हस्ते महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व उद्देशिका यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करून गौरवण्यात आले.



त्यानंतर भारतीय संविधानातील उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर संविधान दिनानिमित्त विविध विभागाच्या प्रमुखांनी संविधान दिना विषयी माहिती उपस्थितांना दिली यावेळी बाल विकास अधिकारी एकात्मिक बाल विकास प्रकल्प सुनिता सनान्से, कृषी अधिकारी सुनील सूर्यवंशी,कृषी विस्तार अधिकारी जोगेंद्र अहिरराव, कृषी विस्तार अधिकारी राजेंद्र लांडगे,पशुधन विकास विभागाचे अश्फाक सय्यद,सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरगाणा महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुरगाणा येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नोव्हेंबर संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी या दिनाचे औचित्य साधून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले व संविधान प्रार्थना घेण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी उंबरठाण महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुभाष पवार प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रा.पवार यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर




यांना अभिवादन केले आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी त्यांनी लिहिलेल्या संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्ययुद्धासाठी लढणाऱ्या नेत्यांचे आणि क्रांतिकारकांचे स्मरण केले आणि २६/११ च्या हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली वाहिली.

भारताच्या धर्मनिरपेक्ष संविधानाचे स्मरण करून त्यांनी सर्वांना संविधानाची तत्वे आणि उद्देश आत्मसात करण्याचे आवाहन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रा. व्ही. डी. अहिरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संविधान दिनाचे महत्त्व, त्याच्या उत्सवाचे महत्त्व यावर भर दिला आणि भारतीय संविधानाच्या विकासात योगदान देणाऱ्या लोकांचे स्मरण केले. त्यांनी इतर देशांपेक्षा भारतीय संविधानातील मूलभूत हक्क यावर प्रकाश टाकला, ज्यात सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक गरजा यासारख्या संविधानाच्या पूर्वअटी दर्शविणाऱ्या उदाहरणे दिली. भारतीय संविधानाची प्रस्तावना म्हणजे भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक आहे जो सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता मिळवून देण्याचे आणि राष्ट्राची एकता आणि अखंडता राखण्यासाठी बंधुत्वाला प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवतो, यावर त्यांच्या भाषणात भर देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. सुरेश भोये यांनी केले. कार्यक्रमास डॉ. चंद्रकांत पाटील, प्रा. भगवान महाले , प्राध्यापकवृंद , शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या सोबत विनोद शिरसाठ संपादक साधना साप्ताहिक यांचे हितगुज

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी (ज्योत्सना करवाडे ):** विनोद शिरसाठ यांचे नागपूर येथे प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कारने सन्मानित करण्यात येण्यात आहे.डॉ.नरेंद्र दाभोलकर हे साधना साप्ताहिकाचे पूर्व संपादक होते. मारवाडी फाउंडेशन च्या वतीने विनोद शिरसाठ यांना प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार एक लाख रोख व



सन्मानचिन्ह सायंकाळी २७ नोव्हेंबर ला देण्यात येणार आहे.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती निकट संबंध असल्यामुळे ते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर येथील कार्यकर्त्याशी सवांद सांधणार आहेत. त्या करिता सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण ऑफिस गवर्नमेंट ITI (आय. टी.आय.) समोर रहाटे कॉलनी नागपूर येथे २७ नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) रोजी सकाळी १०:०० वाजता सभेचे प्रयोजन करण्यात आले आहे. कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त संख्येने सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती असे आवाहन डॉ सुनिल भगत, प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर यांनी कळवले आहे.

**दिनांक :- २७ नोव्हेंबर २०२५ (गुरुवार)**

**वेळ :- सकाळी १०:०० वाजता**

**स्थळ :- सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण ऑफिस गवर्नमेंट ITI (आय. टी.आय.) समोर रहाटे कॉलनी नागपूर**

## उत्सव लोकशाहीचा!; अनुभव मूल्यांचा वेगवेगळ्या उपक्रमाने संविधान दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी कळमनुरी** : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने आणि शांतीलाल मुथा फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने मूल्यवर्धन कार्यक्रम राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांमध्ये राबविल्या जात आहे राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यातर्फे सर्व शाळांना संविधान दिन हा विशेष कार्यक्रम साजरा करण्यासाठी निर्देश देण्यात आले




होते त्या अनुषंगाने हा कार्यक्रम मध्य मूल्यदृढ व्हावा ह्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पुणे यांनी सुचवलेल्या नऊ उपक्रमापैकी एक किंवा त्याहून अधिक उपक्रम शाळेत राबवावेत अशा उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्य दृढ होतील आणि संविधान दिन हा फक्त औपचारिक न राहता मूल्य निश्चित शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात येईल यासाठी तालुक्यातील सर्व शाळेमध्ये हा दिन साजरा करण्यात आला असून अनेक शाळेवर वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले अनेक शाळेवर सिल्फी पॉईट. प्रभात फेरी. संविधान आधारित विविध स्पर्धा घेण्यात आल्या जिल्हा परिषद शाळा नांदापूर या शाळेत घेण्यात आलेल्या उपक्रम सेल्फी पॉईंट घेण्यात आला हा सर्वत्र आदर्श घेण्यासारखा ठरला कारण त्या सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता त्याच्यावर संविधान दिन असे लिहून असल्यामुळे सर्व मुलांना आनंदात सेल्फी घेताना प्रत्येक मुला मुलींना हा संविधान दिन अतिशय आदर्श वाटत होता

सर्वत्र शाळेवर घेण्यात आलेल्या उपक्रमात व सोनुने साहेब गट शिक्षणधिकारी कळमनुरी व गोरे साहेब विस्तार अधिकारी शांतीलाल मुथा फाउंडेशन चे मूल्यवर्धन तालुका समन्वयक विजय खुडे यांनी सर्व तालुक्यातील शाळे वर घेण्यात येत असलेल्या उपक्रम बाबत विचारणार करून त्यांना मार्गदर्शन करण्याचे व सहकार्य करण्याचे काम केले असून तालुक्यातील सर्व च शाळेवर खूप चांगल्या प्रमाणात संविधान दिन साजरा करण्यात आला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# धूळ आणि खड्ड्यांचा जीवघेणा प्रवास!; 'लिहाखेडी फाटा ते सारोळा' रस्ता बनला मृत्यूचा सापळा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) अनास्थेमुळे सिल्लोड तालुक्यातील 'लिहाखेडी फाटा ते सारोळा' हा महत्त्वाचा रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून, या रस्त्यावर तब्बल ५ ते १० फुटांपर्यंत खोल खड्डे पडले आहेत. हे खड्डे म्हणजे निव्वळ अपघाताचे ठिकाण नसून, ते स्थानिक नागरिकांचे आरोग्य आणि जीव धोक्यात आणणारे 'मृत्यूचे सापळे' बनले आहेत.आरोग्याला धोका आणि वाढते अपघात: या रस्त्यावरून रोज प्रवास करणाऱ्या जेष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. धूळ, धक्के आणि खड्डे चुकवताना होणाऱ्या त्रासामुळे पाठ, कंबर दुखी तसेच श्वसनाचे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. दुचाकी, चारचाकी, बस यांना व्यवस्थित रस्ता नसल्याने मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. दररोज अपघातांची शक्यता वाढल्याने हा प्रवास जीवघेणा बनला आहे.

या रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर आहे की, या भागातील नागरिकांना जाण्यासाठी 'खास खड्डे चुकवण्याचे कौशल्य' आत्मसात करावे लागले आहे. खड्ड्यांमुळे होणाऱ्या त्रासाने संतप्त झालेल्या नागरिकांनी आता सार्वजनिक बांधकाम विभाग,



सिल्लोड यांच्याकडे तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. उंडणगाव येथील एसटी कर्मचारी संदीप नारायण इंगळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेल्या पत्रात "या रस्त्यावरील सर्व खड्डे बुजवून लवकरात लवकर रस्त्याचे काम करावे," अशी विनंती केली आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष कधी थांबणार?**

जनतेच्या जीवाची किंमत न करता सार्वजनिक बांधकाम विभाग केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. रस्त्याच्या कामास विलंब झाल्यास नागरिकांच्या आरोग्याच्या आणि अपघाताच्या वाढत्या घटनांना प्रशासन जबाबदार असेल, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली आहे.

# रेवदंडा–चौल परिसरात 'गुलाबी थंडी'चे आगमन!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : समुद्रकिनारी गार झुळुका, शेकोट्यांभोवती पर्यटक व नागरिकांची ऊबदार गर्दी.रेवदंडा, चौल व आजूबाजूच्या किनारी विभागात अखेर 'थंडीची गोड चाहूल' लागली आहे. नोव्हेंबरच्या उत्तरार्धापासून हळूहळू वाढत जाणारा गारवा आता ठसठशीतपणे जाणवू लागला आहे. रात्रीच्या वेळी गार वारे अंगाला चरे पाडतील इतके बोचरे होत असून, पहाटे दाट धुक्याची दुलई संपूर्ण परिसर झाकून टाकते. समुद्र किनाऱ्याच्या जवळ असल्यामुळे रेवदंड्यात यंदाची थंडी आणखी गारठून येत आहे.पहाट ते संध्याकाळ थंडीचा स्पष्ट प्रभाव पहाटेच्यावेळी कामावर जाणारे चाकरमानी, शालेय विद्यार्थी, दूध-वितरक, मासेमार आणि फेरफटका मारणारे नागरिक स्वेटर, कानटोपी, मफलरचा वापर करताना दिसू लागले आहेत. दिवसभर समुद्रकाठावरून येणाऱ्या गार झुळुकींमुळे



वातावरण थंडगार राहते, तर दिवस ढळताच हवा अधिकच गारठते.शेकोट्यांचा वाढता माहोल; पर्यटकही मजा लुटताना दिसत आहेत. सुरुवातीला हवीहवीशी वाटणारी ही थंडी आता शरीरात हुडहुडी भरवू लागली आहे. त्यामुळे रस्त्यांच्या कडेला, चौकांमध्ये, चहाच्या टपऱ्यांपाशी तसेच अनेक घरांच्या अंगणात शेकोट्या पेटू लागल्या आहेत.यात विशेष म्हणजे रेवदंडा समुद्रकिनाऱ्यावर आलेले पर्यटकही शेकोटीभोवती बसून थंडीची ऊब घेत 'गुलाबी थंडीचा' आनंद घेताना दिसत आहेत. शेकोट्यांची उबदार flame, समुद्राच्या लाटांचा आवाज आणि थंड हवेच्या स्पर्शात पर्यटक जणू छोट्या 'हिवाळी बीच पार्टी'चा अनुभव घेत आहेत. अनेकांना या थंडीमुळे हलकी हुडहुडीही लागत आहे, पण गारवा आणि उबदार वाऱ्यांचा हा अनोखा संगम पर्यटकांना अधिक रसरसून भावतो आहे. थंडी वाढताच बाजारपेठेत चैतन्यउबदार कपड्यांची धांदल कपाटात बंद ठेवलेले स्वेटर, शाल, ब्लॅंकेट, कानटोप्या पुन्हा बाहेर पडले आहेत. बाजारपेठेतही विविध प्रकारचे उबदार कपडे, हातमोजे, मफलर, स्टायलिश हिवाळी फॅशन आयटमची लगबग वाढली आहे. विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, यंदाची थंडी उशिरा आली असली तरी विक्रीवर चांगला परिणाम दिसून येतोय.दिवाळीत न जाणवलेली थंडी आता जोरात.दरवर्षी दिवाळीच्या काळात भासणारी टिपिकल थंडी यंदा जवळपास महिनाभर उशिरा आली. मात्र आता ती जाणवू लागली असून पहाटे व रात्रीच्या सुमारास तापमानात चांगलीच घट दिसून येते. समुद्रकाठाच्या गावांमध्ये ही थंड हवा अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याने नागरिक आणि पर्यटक दोघेही हिवाळ्याचा हा अनुभव मनसोक्त घेत आहेत.येणाऱ्या दिवसांत गारव्यात आणखी भर हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवसांत तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रेवदंडा–चौल परिसरातील ही 'गुलाबी थंडी' अधिकच जोमानं जाणवणार आहे.थंडीचा हा गोलाईदार, गोड अनुभव नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद आणतोय, तर पर्यटकांनाही समुद्रकाठच्या हिवाळ्याची रोमँटिक अनुभूती मिळत आहे. थंडीने सजलेलं हे सुंदर हवामान सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.

# शेतात काम करून डोमेगावचे शेळके दांपत्य भागविताहेत रुग्णाच्या औषधीचा मासिक खर्च

**दैनिक युवक आधार**

**अंबड/प्रतिनिधी** : गावात स्वखर्चाने शौचालये बांधून देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविणारे अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील सविता शेळके व बाबासाहेब शेळके हे दांपत्य गावातील एका गरीब मानसिक रुग्णाच्या औषधीसाठी दरमहा लागणारा खर्च स्वतः शेतात मोलमजुरीचे काम करून भागवित आहेत.डोमेगाव येथील मानसिक रुग्ण असलेल्या गणेश अजबराव वराडे याच्या औषधोपचारासाठी कुटुंबियाकडे पैसे नव्हते तेव्हा सदर बाब सविता शेळके यांना



कळाल्यानंतर त्यांनी पती बाबासाहेब शेळके यांच्या कानावर टाकली. ग्रामपंचायत कर्मचारी असलेले बाबासाहेब शेळके यांची मदतीची इच्छा होती. मात्र त्यांचा पगार थकलेला असल्याने ते आर्थिक मदत करण्यात असमर्थ ठरले.तेव्हा सविता शेळके यांनी आपल्या अंगावरील दागिने गहाण ठेवून गणेश वराडे यांच्या औषधोपचारासाठी आर्थिक मदत करीत आपल्या मनाचा मोठेपणा दाखवून दिला.वेळेवर औषधोपचार मिळाल्याने वराडे हे रुग्णालयातून बरे होवून घरी परतले. दरम्यान गणेश वराडे यांना सध्या महिन्याकाठी सुमारे 6 हजार रुपयांच्या विविध औषधी लागतात. मात्र ते दरमहा 6 हजार रुपये खर्च करू शकत नाही.रुग्णाला बरं व्हायचं असेल तर त्यासाठी औषधी ही खुप महत्वाची असते ही बाब माहित असल्याने सविता शेळके या औषधी खर्चासाठी दुसऱ्याच्या शेतात जाऊन कापूस वेचणीचे काम करत आहेत. त्याचप्रमाणे बाबासाहेब शेळके हे ही लोकांच्या शेतात जाऊन कपाशीवर औषधी फवारणीचे काम करत असून या कामातून मिळणारे पैसे शेळके दांपत्य वराडे याच्या दरमहा लागणाऱ्या औषधीसाठी खर्च करत आहेत. अर्थिक परिस्थिती सक्षम नाही असे कारण पुढे करून अनेक जण मदत देण्यापासून पळ काढतात मात्र शेळके दांपत्यांनी स्वतःची अर्थिक परिस्थिती सक्षम नसल्याने थेट मजुरी करून मदत केल्याने गाव व परिसरात त्यांचे मोठे कौतुक होत आहे.

# चोभा निमगाव परिसरातील पुरात वाहून गेलेले विजेचे पोल दोन महिने झाले तरी नादुरुस्तच

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**

आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे व पुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे.यात अनेक ठिकाणी विजेचे खांब पुरामुळे वाहून गेल्याने वीज पुरवठा बंद आहे.आता दोन महिने झाले तरीही चोभा निमगाव परिसरातील विजेच्या तारा व खांबांची दुरुस्ती न झाल्यामुळे शेतकरी वर्गावर महावितरणने पुन्हा नवे संकट उभे केले आहे.

सप्टेंबर 2025 महिन्यात कांबळी नदीला दोन वेळा आलेल्या महापुरामुळे नांदा आणि निमगाव चोभा परिसरातील नदीकाठची सर्व पिके वाहून गेली. सोबत विजेचे खांबही वाहून गेले. या परिसरात जोशी मळा (निमगाव चोभा) हद्दीतील डीपीवरून छगन बनसोडे ( नांदा) यांच्या विहिरीपर्यंतचे 8 खांब आणि तारा वाहून गेल्या.या परिसरात 7



विहिरी असून, जवळजवळ 50 हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. खरीप पीक वाहून गेले असून, उरलेल्या पिकाला पाणी देता येत नाही.

त्यामुळे रब्बीची पेरणीही थांबली आहे. परिसरातील शेतकरी वारंवार कडा, आष्टी येथील महावितरण कार्यालयात पाठपुरावा करत आहेत, परंतु त्याची दखल घेतली जात नाही.येत्या चार दिवसात विजेची समस्या न सोडल्यास शेतकरी महावितरण कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

# आपण एक संधी द्या; आपल्या भागाचा विकास करून चित्र बदलून टाकू – अब्दुल भैय्या शेख

**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी (लखन वाल्हेकर)** : कुकाणा (ता. नेवासा) येथील साई श्रद्धा लॉन्स येथे आयोजित महिलांच्या मेळाव्यास अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. महिलांनी एकमताने हात वर करून अब्दुल भैय्या शेख यांना निवडणुकीत उतरावे यासाठी उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवला.

भैय्या सामाजिक प्रतिष्ठान आणि अब्दुलभैय्या शेख यांच्या संकल्पनेतून भव्य दिव्य नोकरी मेळावा, शासकीय योजना मेळावा आणि आरोग्य कार्ड वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमास परिसरातील माता–भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि युवक–युवतींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

**कार्यक्रमास उपस्थित मान्यवर**




या कार्यक्रमाला नेवासा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मा. बाळासाहेब मुरकुटे, तालुकाध्यक्ष अशोकजी मोरे, कुकाणा सरपंच सौ. लताताई अभंग, ग्रा.पं. सदस्या हकिमाबी शेख, युवा नेते मा. अमोलजी अभंग, तसेच तस्मिया शेख, विलासराव देशमुख, मकरंद राजहंस, जस्मिन शेख, यास्मिन शेख, राजेंद्र बागडे, बाबासाहेब नवथर, सतीश कावरे, आबासाहेब गर्जे, गोविंद सर, इम्तियाज शेख, अभिराज आरगडे, महेश उगले, सुशांत सोनवणे, विश्वजीत देशमुख, सचिन सरोदे, राहुल चाबुकस्वार आदी मान्यवर उपस्थित होते.

**नोकरी मेळाव्याला मिळाला भरघोस प्रतिसाद**

नोकरी मेळाव्यासाठी देशातील नामांकित कंपन्या आणि त्यांच्या HR प्रतिनिधींनी उपस्थित राहून मोठ्या संख्येने युवक–युवतींची मुलाखत घेतली. अनेकांना तात्काळ रोजगार संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. सर्वसामान्य नागरिकांनीही या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

कार्यक्रमादरम्यान महिलांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि स्थानिक समस्या जाणून घेण्यात आल्या. महिलांनी मनमोकळेपणाने आपली मते व्यक्त केली व अब्दुल शेख यांच्या पुढाकाराचे कौतुक केले.

**उपक्रमाचे यश**

या भव्य कार्यक्रमाच्या यशामागे अब्दुल भैय्या सामाजिक प्रतिष्ठान आणि तस्मिया अब्दुल भैय्या शेख यांचे विशेष योगदान राहिले. संपूर्ण आयोजनाची जबाबदारी तस्मिया शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समर्थपणे पार पाडली."समाजहितासाठी असे उपक्रम भविष्यातही राबवले जातील," असे तस्मिया शेख यांनी सांगितले.

# श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये भारतीय संविधान दिन उत्सहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**लातूर/मोहम्मद पिंजारी** : मुरुड परिसरात नामांकित असलेल्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये आज भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . शाळेचे मुख्याध्यापक बाबू थॉमस व समन्वयक रामेश्वर शेटे यांच्या हस्ते सर्वप्रथम भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . त्यानंतर बाबू थॉमस यांनी संविधनातील हक्क , कर्तव्य व मुल्ये यांची माहिती सर्व विद्यार्थ्यांना आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून दिली .

यावेळी शाळेतील उमेश मारकड , राजेश बावळे , देवेशकुमार साहू यांच्यासह गीता फेरे , वैशाली देशमुख , बबीता गिरी , शांती मार्डी , अर्चना पाटील , ज्योती वांगसकर , महादेवी देशमुख , ज्योती ढेकणे , संध्या माळी , आकांक्षा लोमटे, श्रद्धा शितोळे , तृप्ती काळे , जयश्री जाधव , संगीता बिटले , अश्विनी नाडे , प्रगती कुंभार , रोहिणी कासार , प्रिया बोराडे , सन्ना पठाण , श्रीदेवी माशाळकर




, क्लेरम्मा जेकप, पौर्णिमा जाधव , मंगला देशमुख आदी शिक्षक / शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

# घरेलू कामगार समन्वय समितीच्या राज्य सह सचिवपदी कॉ.करवंदा गायकवाड यांची निवड ; सर्व स्तरातून अभिनंदन!

**दैनिक युवक आधार**

**माहुर : (प्रतिनिधी) सय्यद ईसा**

सीटू संलग्न महाराष्ट्र राज्य घर कामगार संघटनेच्या जिल्हा सरचिटणीस कॉ.करवंदा गायकवाड यांची राज्य कमिटीच्या सह सचिवपदी नुकतीच निवड झाली.नाशिक येथील सीटू भवन खुटवड नगर सातपूर येथे पार पडलेल्या ३ ऱ्या राज्य अधिवेशनात त्यांची निवड झाली असून नांदेड जिल्ह्यातील ३ प्रतिनिधी उपरोक्त अधिवेशनासाठी उपस्थित होते.

यावेळी सीटू चे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राज्य अध्यक्ष कॉ.डॉ.डी.एल.कराड यांनी पहिल्या सत्राचे उदघाटन केले.



सभेला मार्गदर्शन करण्यासाठी सीटूचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते.२४ नोव्हेंबर रोजी संपन्न झालेल्या राज्य अधिवेशनात राज्य अध्यक्षा म्हणून कॉ.ॲड.आरमायटी इराणी तर राज्य सरचिटणीस म्हणून कॉ.किरण मोघे यांची एकमताने फेरनिवड करण्यात आली.

यावेळी नांदेड जिल्ह्याच्या सरचिटणीस कॉ.करवंदा गायकवाड यांची राज्य सह सचिव पदी तर कॉ.गंगाधर गायकवाड यांची राज्य कमिटी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. कॉ.करवंदा गायकवाड ह्या सीटूच्या लढाऊ कार्यकर्त्या असून त्यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यात व राज्यात अनेक आक्रमक आंदोलने झाली आहेत. त्यांची राज्य कमिटीच्या सह सचिव व कॉ.गंगाधर गायकवाड यांची राज्य कमिटी सदस्यपदी एकमताने निवड झाल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांना सदिच्छा देण्यात येत आहेत.अशी माहिती सीटू जिल्हा महासचिव कॉ.गंगाधर गायकवाड यांनी दिली आहे.

# वंचितच्या विचारधारेच्या अपक्ष उमेदवारांना वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा – रामप्रसाद थोरात

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या व पक्षाच्या विचारधारेने व आदेशाने वंचित बहुजन आघाडी परतूर नगर पालिकेच्या निवडणूकित रिंगणात उतरली आहे.परतूर नगर पालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरलेली वंचित बहुजन आघाडी ही धन- दांडग्याना बाजूला ठेवण्यासाठी' निवडणूक लढवत असल्याची माहिती पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली.त्यांनी आपल्या भूमिकेतून सत्ताधारी व राजकीय भागीदारांवर निशाणा साधला आहे.पक्षाचे सर्व उमेदवार स्वच्छ प्रतिमा व नैतिकतेला धरून




निवडणूक लढवत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यावेळी या पत्रकार परिषदेला वंचितचे जिल्हा महासचिव डॉ. किशोर त्रिभुवन, तालुकाध्यक्ष, रविंद्र भदर्गे, शहर अध्यक्ष राहुल नाटकर, नगराध्यक्षा पदाच्या अपक्ष उमेदवार सौ.शिवालीताई स्वामी, प्रभाग क्रमांक 11 चे स्वप्निल पहाडे, प्रभाग क्र.6 च्या नगरसेवक पदाच्या उमेदवार सौ.अश्विनी योगेश गाते व प्रभाग क्रमांक 10 चे नगरसेवक पदाचे उमेदवार उस्मान शेख, भारिपचे माजी जिल्हा अध्यक्ष गौतम खंडागळे,राजेंद्र वांजोळे, गुलाब दवंडे,कैलास पहाडे, दिपक हिवाळे, प्रदिप साळवे आदी उपस्थित होते.थोरात यांनी अत्यंत कठोर शब्दांत राजकीय घडामोडींवर भाष्य केले. सुरुवातीला शिवसेना (उबाठा )सोबत आघाडीची चर्चा झाली, मात्र केवळ दोन वॉर्डांच्या वाटाघाटीत ती फिस्कटली.अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीसोबत आपली चर्चा झाली नव्हती असेही त्यांनी स्पष्ट केले.

विश्वासघात झाल्याची भावना व्यक्त करताना थोरात म्हणाले की विश्वास देऊन धोका द्यायचा हे अत्यंत वाईट असून अजित पवार गटांनी शिवसेना ठाकरे गटाची ऐनवेळेस गोची केल्याने शिवसेना त्यांच्यासोबत गेली.वॉर्डातील नागरिक सुविधा ,स्वच्छता, पिण्याचे पाणी,स्ट्रीट लाईट,रस्ते गटार व्यवस्था इत्यादी वर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.शहरात सांडपाण्याचा निचरा होत नाही, सांडपाणी हे जागच्या जागी जिरत आहे, त्यामुळे रोगराई पसरन्याची दाट शक्यता निर्माण होत आहे. आपल्या उमेदवारांना जर जनतेने निवडून दिले तर आपण या सर्व गोष्टीकडे विशेष लक्ष देऊ असे त्यांनी सांगितले.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधकांना हिशोब चुकता करण्याची भूमिका पक्षाने घेतली असल्याचे स्पष्ट केले. वंचित बहुजन आघाडी परतूरच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी निवडणूक लढवत आहे. शहर पूर्णपणे अस्वच्छ आहे. रस्ते, पाणी, वीज, शिक्षण आणि बेरोजगारांना रोजगार यासह अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी संधी मिळावी,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.शहरातील काही प्रभागांमधील आमच्या विचारधारेचे अपक्ष उमेदवार आमच्यासोबत येत असतील, तर त्यांना पाठिंबा देण्याबाबत विचार केला जाईल,असेही थोरात यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## थोडक्यात

### परिवहन आयुक्तांनी केले पर्यावरणपूरक दुचाकीचे उद्घाटन



**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** इलेक्ट्रिक दुचाकी बनवणारी अल्ट्राव्हॉयलेट कंपनीने अंधेरी, वाशी आणि ठाणे येथे तीन नवीन यू व्ही स्पेस स्टेशन्स सुरू केले आहेत. हॉलमार्क मोबिलिटी एलएलपीच्या भागीदारीत सुरू झालेल्या या केंद्रांत एक्स ४७ क्रॉसओव्हर, एफ ७७ सुपरस्ट्रीट आणि एफ ७७ मॅक २ ही मॉडेल्स उपलब्ध आहेत. विक्री, सेवा, सुटे भाग आणि टेस्ट राईड सुविधा एका ठिकाणी मिळणार आहेत.कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी नारायण सुब्रमण्यम यांनी मुंबईतील विस्ताराला "महत्त्वाचा टप्पा" म्हटले आहे. हॉलमार्क मोबिलिटीचे जिग्नेश मेहता यांनीही या भागीदारीला उत्साहाने प्रतिसाद दिला. या दुचाक्यांमध्ये शक्तिशाली पॉवरट्रेन, दीर्घ रेंज, ट्रॅक्शन कंट्रोल, पुनर्निर्मित ब्रेकिंग आणि एक्स–सत्तेचाळीस मध्ये अत्याधुनिक यूव्ही रडार इंटेलिजन्स अशी आधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये आहेत.




**उमरी येथे मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान द्वारा संचलित आदिशक्ती किड्स प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल उमरी येथे भारतीय संविधान दिन निमीत्त विश्वरत्न महामानव भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधानाचे पूजन करून सर्व नागरिक व विद्यार्थास भारतीय संविधान प्रस्ताविकेचे शपथ देत संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाणचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.दादासाहेब ऊर्फ रूपेशकुमार श्रीरामवार उमरी, शहर अध्यक्ष गोकुल सिंग टाक , माधव गोटमवाड, महेश पडोळे, प्रशांत सितावार,बादल सिंग खिची व इतर अनेक जण या वेळी उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार )**

### शेकाप चे ज्येष्ठ नेते बाळाशेठ मुकादम यांचे निधन,वयाच्या 84 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मा.भाताण ग्रामपंचायतचे मा.सरपंच, मा.भात गिरणीचे संचालक, शेतकरी कामगार पक्षाचा लालबावटा अखंडितपणे विभागात फडकावत ठेवला, स्वर्गीय दिबा पाटील, रामशेठ ठाकूर यांचे खंदे समर्थक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते असे बाळाशेठ मुकादम यांचे निधन झाले. वयाच्या 84 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.वृद्धापकाळाने यांची प्रकृती खालावली असल्याने त्यांनी अखेरचा श्वास घेतला.त्यांच्या अंत्यविधीसाठी राजकीय, सामाजिक,शैक्षणिक, कला,क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर हजर होते त्यांच्या पाश्चात तीन मुलं, सुना,नातवंड आणि मुकादम असा मोठा परिवार आहे आहे.त्यांच्या दशक्रिया विधी उद्धर रामेश्वर येथे होणार असून उत्तर कार्य शनिवार २९ नोव्हेंबर रोजी राहत्या घरी भाताणपाडा येथे होणार असून त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात यासाठी हरिभक्त वारकरी संप्रदायातील पंचक्रोशी विभागातील भजन मंडळांना मृदुंगमणी देण्यात येणार आहे.

# सर्व धर्मांत आणि धर्मग्रंथांत मावनतेचाच संदेश : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** "भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन अशा अनेक धर्मांचे लोक राहतात. तसेच अनेक धर्म, पंथ आहेत. महाभारत, रामायण, भगवत गीता, वेद, उपनिषद, पुराण, बायबल, कुराण असे अनेक धर्मग्रंथ आहेत; परंतु सर्व धर्मांत आणि धर्मग्रंथांनी मावनता हाच संदेश दिलेला आहे," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत ख्रिस्ती समाजाच्या एकता मेळाव्यात बोलताना म्हणाले. ख्रिस्ती समाजाचा एकता मेळावा शेलघर येथील जोमा नारायण घरत सभागृहात रविवारी झाला."ख्रिस्ती मिशनरी पूर्वी आमच्या



गावोगावी पुस्तके वाटत असत, मला वाचनाची आवड असल्याने मी ती वाचायचो. पुढे कालांतराने कामगार आणि राजकीय क्षेत्रात यश मिळाल्यावर प्रत्येक धर्माचा मी आदरच केला कॉंग्रेस हा सर्वधर्म समभाव मानणारा पक्ष आहे आणि त्या पक्षाचा मी रायगड जिल्हाध्यक्ष म्हणून काम करतोय. आयुष्यातील ३८ वर्षे मी लोकांच्या सेवेत आहे, पण कधीही जातपात मानली नाही. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत असताना सतत परदेशात जाणे होते. तेथे गुरुद्वार असो वा चर्च असो, मी आवर्जून जातो. पाश्चात्यकालीन बांधकाम पाहून मनस्वी आनंद होतो. अतिशय खडतर समजली जाणारी कैलास मानसरोवर यात्रा मी दोनदा केली. त्यामुळे मी 'कैलाशी' आहे. मी कुठेही गेलो तरी माणसातच देव पाहतो, म्हणूनच मला परमेश्वराने भरभरून दिलेय. त्याचे आभार मानावे तेव्हढे थोडेच आहेत. म्हणूनच 'सुखकर्ता' बंगल्यावरून मी देण्याची भूमिका घेतली आहे. ख्रिस्ती समाज हा विनयशील आहे. त्यामुळे यापुढेही ख्रिस्ती समाजाचा आदर करून त्यांना कालानुरूप सहकार्य केले जाईल. यावेळी प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर आणि पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र पाटील होते. त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ख्रिस्ती समाजाच्या एकता मेळाव्यासाठी महेंद्रशेठ घरत यांनी सभागृह विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ख्रिस्ती समाजाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी डॉक्टर विकास कांबळे यांनी उत्तम प्रवचन केले. बबन कांबळे, विकी कुलकर्णी, धनंजय नाईक, सुंदर राव, राजू दुधभाते, जेसन माथू, आनंद मतमारी, मोहन गटणे, प्रकाश मसिह अँटोनी माथू आणि समस्त उलवे ख्रिस्ती समाज यावेळी उपस्थित होता.

## विषमतावादी समाजरचनेस दिलेले चोख उत्तर म्हणजे संविधान – प्रा.शिवाजी वाठोरे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचा स्वीकार करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या रूपाने विषमतावादी समाजरचनेस चोख उत्तर दिले, असे प्रतिपादन प्रा. शिवाजी वाठोरे यांनी येथे केले. कै. दादासाहेब अन्वीकर स्मारक ग्रंथालयात गुरुवारी (दि.२६) सकाळी ११ वाजता भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ग्रंथपाल कविता कापसे होत्या. या वेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले.

प्रारंभी मुंबई येथे झालेल्या २६/११च्या हल्ल्यातील शहिदांना दोन मिनिटे स्तब्धता पाळून आदरांजली अर्पण करण्यात आली. विजय सपकाळ याची महाराष्ट्र सुरक्षा दलात निवड झाल्याबद्दल



त्याचा पाहुण्यांचे हस्ते हृद्य सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन दत्तात्रेय पालोदकर यांनी तर काकासाहेब साळवे यांनी आभार मानले. या वेळी अमोल सागरे, योगेश काटकर, आकाश तायडे, संतोष खाकरे, रोहित बावस्कर, सौरभ पांढरे, वैभव खाकरे, शिवानी बडक, रुपाली राऊत, नवनाथ दांडगे, प्रतीक गायकवाड, स. जुबेर, स. अरबाज, रोहित शिंदे, मयुर कुदळ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरुजी फाउंडेशन च्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक मदत सांत्वन पर भेट

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर :** उमरी शहरातील विविध भागातील कुटुंबातील प्रमुख व्यक्तीचे निधन झाले त्यांना आधार देण्यासाठी लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी त्यांच्या घरी जाऊन सांत्वन पर भेट दिले त्याचबरोबर त्यांच्या दुःखात सहभागी होत त्यांच्या उदरनिर्वाहनासाठी आपल्या गुरुजी फाउंडेशनच्या माध्यमातून छोटीशी आर्थिक मदत देत स्वतःच्या पायावर उभा करण्याचे काम केले गुरुजी फाउंडेशन जिल्ह्यात काम करत असताना अशा झालेल्या दुःखद प्रसंगी वेळोवेळी मदत करत असते याचाच प्रत्यय आज उमरी शहरात दिसून आला.

यावेळी उमरी शहरातील संजय कुलकर्णी, श्रीनिवास अनंतवार, सुभाष पेरेवार,वसंत जाधव, गुरुजी फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप पाटील



कवळे,माचेवाड सर,शरदजी, उत्तम आयेवार यांच्यासहअदि जन उपस्थित होते.

## उदगीरात संविधान दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा तालुका व शहर शाखेच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासमोर संविधान दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस उदगीरचे आमदार माननीय संजय बनसोडे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, डीवायएसपी गजानन भातलवंडे, मुख्याधिकारी जाधव साहेब, तहसीलदार राम बोरगावकर ग्रामीण व शहरी पोलीस स्टेशनचे पीआय राजकुमार पुजारी व दिलीप गाडे यांनी अभिवादन केले. समता सैनिक दलातर्फे मानवंदना देण्यात आली व संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे तहसीलदार राम बोरगावकर,डी वाय एस पी गजानन भातलवंडे, मुख्याधिकारी श्री जाधव साहेब यांनी संविधानाचे महत्त्व सांगितले यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेच्या प्रतींचे वाटप करण्यात आले तसेच भारतीय बौद्ध महासभेतर्फे उपजिल्हाधिकारी माननीय सुशांत शिंदे यांना संविधानाची प्रत भेट देण्यात आली. यावेळी 26/11 हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर गोविंद सोनकांबळे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उदगीर शहराध्यक्ष माधव कांबळे कलुरकर यांनी केले यावेळी बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष मनोहर कांबळे, शहराध्यक्ष माधव कांबळे, समता सैनिक दलाचे कमलाकर सांगवीकर, समाजसेवक बाबासाहेब सूर्यवंशी, विनायक सोमवंशी, दिलीप कांबळे, उषाताई कांबळे, एडवोकेट विजय गुप्ता, जनार्दन जाधव, वसंतराव शेलारकर, व्यंकटराव सोनवणे, विद्यासागर डोनाळीकर, विमलताई मदने, डोमेराव सर व बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते. राष्ट्रगीता नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## शिवडीमध्ये शैनेश्वर महाराज मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण; प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास २८ ते ३० नोव्हेंबरला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड तालुक्यातील शिवडी येथील शैनेश्वर महाराज मंदिराचा गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेला जीर्णोद्धार अखेर पूर्णत्वास आला असून, नव्याने उभारलेल्या आकर्षक मंदिरात शैनेश्वर महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा २८ ते ३० नोव्हेंबरदरम्यान उत्साहात साजरा होणार आहे. लोकवर्गणीच्या माध्यमातून सुमारे ४० लाख रुपयांच्या खर्चातून मंदिराचे पुनर्निर्माण करण्यात आले आहे.



**पहिला दिवस – शुक्रवार, २८ नोव्हेंबर**

सोहळ्याचा शुभारंभ सकाळी ८ वाजता श्रींची ग्राम मिरवणूक काढून होणार असून त्यानंतर मंडप पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदीश्राध्द, अग्निस्थापना तसेच श्रींचा जलनिवास, सायंपूजन व आरती अशा विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे.

**दुसरा दिवस – शनिवार, २९ नोव्हेंबर**

शनिवारी सकाळी ८ वाजता प्रातःपूजनाने कार्यक्रमास सुरुवात होईल. त्यानंतर योगिनी पूजन, मंगल पूजन, वास्तु पूजन, क्षेत्रपाल मंडळ पूजन, सर्वत्र भद्रा मंडळ पूजन, नवग्रह पूजन व रुद्र पूजनाचे विधी पार पडतील. होम, श्रींच्या मूर्तीस अभिषेक, कळसाभिषेक, धान्यनिवास व आरतीने दुसऱ्या दिवसाचा सोहळा अधिक भक्तिमय होणार आहे.

**तिसरा दिवस – रविवार, ३० नोव्हेंबर**

अंतिम दिवशी सकाळी ८ वाजता प्रातःपूजनानंतर मूर्ती स्थापना, होम, पूर्णाहुती व आरती संपन्न होईल. त्यानंतर सत्यनारायण पूजन तसेच वारकरी शिक्षण संस्था, आळंदी येथील ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांचे कीर्तन भक्तांना अध्यात्मिक ऊर्जा देणारे ठरणार आहे.सोहळ्याची सांगता महाप्रसादाने होणार असून परिसरातील भाविकांसाठी ही आध्यात्मिक मेजवानी ठरणार आहे.

**सोहळ्याचे पौरोहित्य**

या तीन दिवसीय महायज्ञाचे पौरोहित्य वेदशास्त्र पारंगत स्वप्निल वैद्य, भूषण जोशी, दिलीप कुलकर्णी, बाळकृष्ण कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, रोहन कुलकर्णी व पुष्पक कुलकर्णी आदी पुरोहित करणार आहेत.श्रीराम मंदिर संस्थान तसेच शिवडी ग्रामस्थांनी या पवित्र सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन सर्व भाविकांना केले आहे.

## श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दि.22 नोव्हेंबर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. रामशेठ ठाकूर साहेबांच्या 75 व्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन संस्थेच्या अनेक शाखांमध्ये करण्यात आले.दि.22 नोव्हेंबर रोजी या दिनाचे औचित्य साधत संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती. भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात रोल प्ले,स्टॅचू ड्रेस अप, एकपात्री नृत्य,वेशभूषा अश्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वेशभूषा स्पर्धेचे खास आकर्षण पाहायला मिळाले त्यात अनेक चिमुकल्यांचा सहभाग असून काहींनी भगतसिंग,राजगुरू,इंदिरा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज झाशीची राणी तसेच खास आकर्षण तर काही चिमुकल्याणी हुबेहूब मा.श्री.रामशेठ ठाकूर




साहेबांची देखील वेशभूषा करत सर्वांचे लक्ष वेधले.तसेच स्टॅचू ड्रेस अप साठी देखील लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल,विश्व रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भारतमाता,कालिका देवी तसेच अनेकांची प्रतिमा हुबेहूब साकारली काहींनी आपले मदतनिस सफाई कर्मचारी,पोलीस,डॉक्टर,नर्स आदींची भूमिका बजावत सामाजिक संदेश दिले.

यात शंभर हुन अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवत स्पर्धेची शोभा वाढवली. या विशेष प्रसंगी मा.सौ.वर्षाताई ठाकूर ( मेंबर बोर्ड ऑफ कमिटी ज.भ.शि.प्र.संस्था ),मा. ऍडवोकेट श्री.राहुल घरत ( मेंबर बोर्ड ऑफ कमिटी ज.भ.शि. प्र.संस्था ),श्री.सुरेश पाटील,श्री. सुनील पाटील,श्री.मेघनाथ तांडेल,सौ.सीमा घरत तसेच सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.या संपूर्ण स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी श्री.रवींद्र म्हात्रे,श्री. श्रीश म्हात्रे परीक्षक म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन श्री.चंद्रकांत घरत,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.अनुराधा काठे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पनवेल पालिकेच्या डांबरी रस्त्यांसाठी ९६ कोटींचा खर्चRTI ने उघड केले खरे चित्र – तरी खड्डेच खड्डे!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेने १ ऑक्टोबर २०१६ ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतर्गत डांबरी रस्ते व खड्डे दुरुस्तीसाठी एकूण ९६ कोटी रुपये खर्च केले, तरी शहरातील रस्ते आजही खड्ड्यांमुळे अपघातांचे केंद्रबिंदू बनले आहेत.

ही धक्कादायक माहिती पनवेल महाराष्ट्र नवनिर्माण कामगार कर्मचारी सेनेचे उपाध्यक्ष दीपक कोळवणकर यांनी माहितीच्या अधिकारात (RTI) मिळवली असून, आज (२७ नोव्हेंबर) ती अधिकृतपणे उघड करण्यात आली.RTI तपशीलानुसार खर्चाचे ब्रेकअप:

**कालावधी - खर्च (रुपये)**

**१ ऑक्टोबर २०१६ ते ३१ मार्च २०२१-२८ कोटी ३१ लाख**

**१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२४-४० कोटी ५८ लाख**

**१ एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२५-उर्वरित रक्कम**

**एकूण = ९६ कोटी रुपये**

दीपक कोळवणकर यांनी सांगितले,"९६ कोटी रुपये खर्च करूनही खारघर, कामोठे, कलंबोली, तळोजा व नवीन पनवेलमधील रस्ते दर पावसाळ्यात उखडतात.

ठेकेदारांना फायदा व्हावा म्हणूनच निकृष्ट डांबर वापरला जातो.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गेल्या अनेक वर्षांपासून यावर आंदोलने केली आहेत. आजच आम्ही ई-मेलच्या माध्यमातून पनवेल महानगरपालिका आयुक्तांना ९६ कोटींच्या खर्चाची चौकशी, गुणवत्ता ऑडिट व कायमस्वरूपी कॉंक्रीट रस्त्यांची मागणी करणारे पत्र पाठवले आहे." पनवेलमहानगर अध्यक्ष तथा पक्षाचे प्रवक्ते श्री योगेश जनार्दन चिले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पनवेलमध्ये यापूर्वीही अनेकदा खड्ड्यांच्या विरोधात तीव्र आंदोलने केली आहेत. २०२३ मध्ये खारघर-कामोठे रोडवर खड्ड्यांत रोपे लावून निषेध नोंदवला होता, तर २०२४ मध्ये शेडुंग टोल नाक्यावर रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात जोरदार मोर्चा काढला होता.

सध्या नोव्हेंबर २०२५ मध्ये पालिकेने चारही झोनमध्ये डांबरीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. मात्र दीपक कोळवणकर यांनी प्रश्न उपस्थित केला,

"निवडणुका जवळ आल्या की फक्त पैचवर्क केले जाते. पावसाळा आला की पुन्हा खड्डेच दिसतात.

९६ कोटींच्या या खर्चाची चौकशी व्हायलाच हवी."पालिकेकडून अद्याप यावर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे.

## श्री छत्रपती महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालय भवानीनगर येथे बुधवार दि 26 नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता महाविद्यालयाच्या आवरात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्या शिवाली माने देशमुख यांच्या हस्ते महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचे व संविधानाचे पूजन करण्यात आले यावेळी प्रा.अस्मिता चांदगुडे यांनी संविधान विषयी माहिती सांगून त्याचे महत्व विद्यार्थीनां समजून सांगण्यात आले तसेच प्रा.कु हर्षदा वानखेडे यांनी विध्यार्थी व प्राध्यापक यांना संविधानाची उदेशीकाची प्रतिज्ञा देण्यात आली.हा संविधान दिन साजरा करण्यात महाविद्यालयातील विध्यार्थी आणि सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्या शिवाली माने देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संविधानाबाबत जनजागृती करुन देण्याची गरज आपल्या सर्व विध्यार्थी व प्राध्यापक यांची असून त्यांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अस्मिता चांदगुडे यांनी केले तर आभार प्रा.बाबासाहेब चव्हाण यांनी केले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# भारतरत्न लालबहादूर शास्त्री राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार 2025



**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान दगडू पाटील :** म्हसावद ता.जि. जळगाव येथील स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य आदरणीय बापूसाहेब श्री पी डी चौधरी सर यांना आदिलशहा फारुकी संस्था जळगावद्वारा माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री *राज्यस्तरीय शिक्षण सेवा पुरस्कार २०२५* 23 नोव्हेंबर 2025 रोजी अल्पबचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आदरणीय मुख्याध्यापक श्री पी डी चौधरी सर यांना आतापर्यंत दोन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, एक राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार तीन जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श पर्यावरण शिक्षक पुरस्कार तसेच दोन तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे . या निमित्ताने थेपडे विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री जी. डी. बच्छाव सर पर्यवेक्षक श्री के.पी. पाटील सर शिक्षक प्रतिनिधी सचिन चव्हाण सर जुनिअर कॉलेज विभागप्रमुख श्री वाय. पी. चिंचोरे सर आणि विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्यातर्फे आदरणीय प्राचार्य यांच्या अभिनंदन व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. बापूसाहेब श्री पी डी चौधरी सर यांना सर्वांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# पोस्कोच्या सामाजिक बांधिलकीतून आरोग्य सेवा: ३२८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव :-**ग्रामीण भागांमध्ये मोतीबिंदू सारख्या आजाराकडे दुर्लक्ष होत असताना, पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने गेल्या काही वर्षांत समाजासाठी आशेचा किरण ठरलेला एक उपक्रम सातत्याने राबवला आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया मोहीम गेल्या काही वर्षांपासून कंपनीच्या आसपासच्या पाच ग्रामपंचायती (भागाड, विळे, वरचीवाडी, सणसवाडी, साजे) मध्ये राबवण्यात येत असून, या उपक्रमाद्वारे या भागातील नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष प्रकाश फुलवण्यात कंपनीला यश आले आहे.



या वर्षी घेतलेल्या मोतीबिंदू तपासणी शिबिरांना नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. तपासणीत मोतीबिंदू निदान झालेल्या एकूण ९० मोफत शस्त्रक्रिया कंपनीच्या सी.एस.आर. उपक्रमांतर्गत करण्यात आल्या आहेत. या ९० शस्त्रक्रियांमुळे अनेक जेष्ठ नागरिकांना पुन्हा स्वच्छ दृष्टी प्राप्त झाली आहे. मागील काही वर्षांचा विचार केल्यास, या उपक्रमाद्वारे एकूण ३२८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य करण्यात आल्या आहे - आणि हा आकडा सामाजिक बांधिलकीचा आणि मानवी संवेदनशीलतेचा ठोस पुरावा ठरतो.

या संपूर्ण उपचार प्रक्रियेत रुग्णांची फक्त तपासणीच केली जात नाही, तर त्यांचा संपूर्ण प्रवास कंपनीकडून नियोजनबद्ध पार पाडला जातो. प्राथमिक तपासणी, हॉस्पिटलमध्ये ने-आण, तज्ज्ञ डॉक्टर्समार्फत शस्त्रक्रिया, औषधे, तसेच ऑपरेशननंतरची काळजी, चष्मा - या सर्व सुविधा पोस्को महाराष्ट्र स्टीलकडून पूर्णपणे मोफत पुरविल्या जातात. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेनंतर कंपनीचे अधिकारी स्वतः रुग्णांच्या घरी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची पाहणी करतात व चष्मा वाटप करतात. ग्रामीण भागातील नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानच या उपक्रमाचे खरे यश आहे. अनेक कुटुंबांना या सुविधेमुळे मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याचाही अनुभव सांगितला आहे.

आरोग्यासारख्या मूलभूत गरजांमध्ये हातभार लावून कंपनीने समाजाशी आपले नाते अधिक दृढ केले आहे. ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, कोणाकडे पैशांच्या अभावामुळे उपचार थांबू नयेत आणि प्रत्येकाला स्वच्छ दृष्टीचा हक्क मिळावा - याच विचारांनी हा उपक्रम पुढे नेला जात आहे.

कंपनीचा संकल्प स्पष्ट आहे - या उपक्रमातून पुढील काळात अधिक नागरिकांना मोफत उपचार उपलब्ध करून देणे, आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शक्य तितका “प्रकाश” पोहोचवणे. मोतीबिंदूमुळे दृष्टीतील कमतरता अनेकांना अपंग / अवलंबित्व आणते अश्या स्थितीत कंपनीने यासंदर्भात घेतलेले हे पाऊल अभिनंदनीय आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## थोडक्यात

### डॉ . मिनल दवंडे यांना पीएचडी प्रदान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग**
**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामार्फत बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि बिझनेस मॅनेजमेंट या विषयात “Strategic Business Model to Generic Medicines – An Empirical Study (With Special Reference to Nagpur Region)” या संशोधन प्रबंधावर मिनल दवंडे यांनी पीएच. डी.पदवी प्राप्त केली आहे.नागपूर विभागातील जनरिक औषध व्यवसायाच्या संरचना, बाजारपेठेतील मागणी-पुरवठा, उद्योगांसाठी उपयुक्त धोरणात्मक मॉडेल्स यांचा त्यांनी अभ्यास करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष प्रबंधातून मांडले आहेत. जनरिक मेडिसिन सेक्टरमध्ये टिकाऊ, परिणामकारक आणि ग्राहकाभिमुख व्यवसाय मॉडेल्स कसे उभारता येतात, यावर त्यांच्या संशोधनात ठोस दिशा देण्यात आली आहे.डॉ. मिनल दवंडे यांना डॉ. वैशाली रहाते यांचे मार्गदर्शन मिळाले. डॉ.मिनल दवंडे यांच्या या कर्तृत्वपूर्ण यशाबद्दल मार्गदर्शक प्राध्यापक, कुटुंबीय आणि सहकारी यांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून पुढील संशोधन आणि अकादमिक क्षेत्रातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### श्री छत्रपती मुलांचे हायस्कूलच्या वतीने भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**
इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री छत्रपती हायस्कूल यांच्या वतीने भवानीनगर गावातील बुधवार दि.२६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि औत्सुक्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली.या माध्यमातून संविधानाच्या मूल्यांचे पुनःस्मरण करून जागरूकता निर्माण होण्यासाठी बाजारपेठेतुन रॅली कढण्यात आली. कार्यक्रमादरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. उपस्थित महिला शिक्षिका, पुरुष शिक्षक तसेच हायस्कूलच्या मुलांना भारतीय संविधानाचे महत्त्व त्यातील अधिकार आणि कर्तव्यांची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे संविधानाबद्दल जनजागृती वाढली असून भारतीय संविधानातील समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले.श्री छत्रपती हायस्कूलच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.यावेळी दिपक निंबाळकर सर विजय चव्हाणसर अमोल निंबाळकर सर पवार सर आदी शिक्षक उपस्थित होते

### आडद शेतशिवारात तरुण शेतकऱ्याची आत्महत्या



**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड :** उमरखेड तालुक्यातील आडद गावात शेतकऱ्याच्या आत्महत्येची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर दादाराव कबले (वय 35 वर्षे) या तरुण शेतकरी ज्याची अडद शिवारात सर्वे न.३०/१ चार एकर शेती आहे. शेतकऱ्याने स्वतःच्या शेतात नापिकी व कर्जाला कंटाडून गळफास घेऊन जीव दिला. ही घटना २३ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ९.३० ते ११.३० या वेळेत घडल्याचे पोलिस तपासातून स्पष्ट झाले आहे.फिर्यादी संतोष हनवता कबले (वय 35) यांनी पोफाळी पोलिस स्टेशनला दिलेल्या रिपोर्टनुसार, दिवंगत ज्ञानेश्वर गेल्या काही दिवसांपासून शेतातील सततच्या नापिकीमुळे प्रचंड मानसिक तणावाखाली होता. आर्थिक अडचणींनी ग्रासलेल्या या तरुण शेतकऱ्याने अखेर शेतीतील संकटांवर उपाय न दिसल्याने टोकाचा निर्णय घेतला.ग्राम आडद शिवारातील ए स्वतःच्या शेतात त्याने गळफास घेतल्याचे उघड होताच गावात शोककळा पसरली. कुटुंबीय, नातेवाईक आणि ग्रामस्थांत हळहळ व्यक्त केली जात असून,तीन मुली व एक मुलगा असे अपत्य आहे. सदरील आत्महत्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे.घटनेचा मर्ग दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोफाळी पोलीस करीत आहेत.

# श्रीवर्धन नगरपालिका निवडणूक 2025 : पक्षचिन्ह नोंदणीची प्रक्रिया पूर्ण; निवडणूक रंगत आणखी वाढली

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**
श्रीवर्धन : आगामी नगरपरिषद निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर आज एक महत्त्वाची प्रक्रिया पार पडली. विविध राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांना त्यांच्या पक्षचिन्हांची नोंदणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. यामुळे निवडणुकीची रंगत अधिकच वाढली असून, प्रचारयुद्धाला आता अधिकृत सुरुवात झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट) तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या प्रमुख पक्षांच्या उमेदवारांना तसेच अपक्ष उमेदवारांना त्यांच्या अधिकृत पक्षचिन्हावर निवडणूक लढण्याची अंतिम परवानगी देण्यात आली.

ही संपूर्ण प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी, नायब तहसीलदार, श्रीवर्धन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, अधिकारी वर्ग आणि सर्व पक्षांचे




उमेदवार यांच्या उपस्थितीत अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडली. उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी, पडताळणी आणि अंतिम मान्यता मिळाल्यानंतर चिन्ह नोंदणी जाहीर करण्यात आली.पक्षचिन्हे जाहीर होताच उमेदवार आणि समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आता प्रत्येक प्रभागात प्रचाराचा जोर अधिक वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीची तापमानपट्टी चढत असून, मतदारांमध्येही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# सिल्लोड नगरपरिषद निवडणुकीसाठी भव्य पदयात्रेला उत्साही प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** आगामी सिल्लोड नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराला उत्साहात प्रारंभ झाला. खासदार डॉ. कल्याणरावजी काळे यांच्या नेतृत्वाखाली म्हसोबा महाराज मंदिरात प्रचाराचा नारळ फोडून पदयात्रेची सुरुवात करण्यात आली. या पदयात्रेदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या पुतळयांना खासदार डॉ. कल्याण काळे साहेब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते पार पडले.खासदार डॉ. काळे यांनी उपस्थित नागरिकांना संबोधित केले. या भव्य रॅलीत जिल्हाध्यक्ष किरणभाऊ डोणगावकर पाटील, पक्षनिरीक्षक डॉ. जफर खान, प्रदेश सरचिटणीस रविंद्रदादा काळे, उपप्रभारी गौरव जयस्वाल ,



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आय अल्पसंख्याक विभाग चे प्रदेश सरचिटणीस कैसर आझाद शेख, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बनेखा पठाण, काँग्रेस तालुकाध्यक्ष भास्कर घायवट, शिवसेना तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष राहुलजी ताठे, माजी तालुकाध्यक्ष अजित पाटील, राष्ट्रवादी शहराध्यक्ष शेख शाकीर, सिल्लोड सोयगाव विधान सभा युवक काँग्रेस अध्यक्ष आवेस आझाद, युवक शहराध्यक्ष जाबेर पठाण, शहराध्यक्ष शेख फिरोज व देविदास दांडगे तसेच आघाडीतील सर्व पक्षांचे उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळा ज्युनियर कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांचा संविधान जनजागृती रॅलीत उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. भारताच्या संविधानाबद्दल जागरूकता वाढावी, तरुण पिढीमध्ये लोकशाही मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. तद्नंतर ईशा पांचाळ या विद्यार्थिनींनी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. यावेळी प्राध्यापक एन. सी. पाटील व प्राध्यापक पी. पी. कसबे यांनी विद्यार्थ्यांसमोर संविधानाचे महत्व विशद केले. त्यांनी संविधान निर्मितीची पार्श्वभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर महाविद्यालयाच्या वतीने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. तळा कॉलेज, एस बी आय बँक, बाजारपेठ, बळीचा नाका ते परत महाविद्यालय असा मार्ग घेत विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत संविधान सन्मानाचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवला. रॅलीदरम्यान 'संविधानाचा सन्मान देशाचा अभिमान', ' लोकशाहीचे रक्षक आपण' अशा प्रभावी घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी परिसरात जनजागृती घडवून आणली. या रॅलीत महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पोलीस व विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. वातावरणात देशभक्तीचा आणि जागृतीचा उत्साह जाणवत होता. तळा ज्युनियर कॉलेजच्या या उपक्रमामुळे संविधानाबद्दलची जाणीव अधिक तीव्र झाली असून तरुणाईमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.



# मुदखेडमध्ये काँग्रेसला नवे बळ – माजी नगरसेवक गंगाधर यशवंतराव डांगे व खदीर कुरेशी यांचा पक्ष प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते :** मुदखेड शहरात आज काँग्रेस पक्षाला महत्त्वपूर्ण बळकटी मिळाली. आदरणीय खासदार रवींद्र वसंतराव पाटील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक गंगाधर यशवंतराव डांगे तसेच समाजातील सर्वमान्य व्यक्तिमत्त्व खदीर कुरेशी यांनी काँग्रेसमध्ये अधिकृत पक्ष प्रवेश केला.

या प्रसंगी खासदार चव्हाण यांनी दोन्ही नेत्यांचे पक्षात स्वागत करताना म्हटले की, “काँग्रेस पक्षाचा व्यापक विकासदृष्टीकोन आणि सार्वजनिक हिताचे कार्य हेच आज पुन्हा जनतेचा विश्वास जिंकत आहे. डांगे साहेब व खदीर कुरेशी यांच्या अनुभवामुळे पक्ष अधिक मजबूत होईल.”

गंगाधर डांगे यांनी आपल्या भावना व्यक्त



करताना सांगितले की, “जनतेसाठी केलेले विकासकाम पुढे नेण्यासाठी आणि मुदखेडच्या प्रगतीसाठी काँग्रेस हा योग्य पर्याय आहे.”तर खदीर कुरेशी म्हणाले, “सामाजिक बांधिलकी व सर्वसमावेशक विचारधारा पाहून मी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.”या पक्ष प्रवेशामुळे मुदखेड मधील काँग्रेसची ताकद आणखी वाढली असल्याचे स्थानिक कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

# धारावीत संविधान दिन साजरा!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (दत्ता खंदारे ) :** भारतीय संविधानाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण झाले. त्याचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.धारावीतील संत रोहिदास मार्गांवर असलेल्या संविधान चौकात भारतीय संविधान दिवस राष्ट्रीय चर्मकार संघाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना एकत्र करुन राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान अर्पण प्रतिमेला पुष्पहार घालून समाजाप्रती आदरांजली व संविधानाचे महत्त्व याविषयी चर्मकार नेते बाबुराव माने यांनी उपस्थित जनसमुदायाला सविधान महत्व पटवून दिले. त्यानंतर अनिल कासारे यांनी संविधानाची उद्देशिकेचे वाचन केले.अत्यंत कमी वेळात समाज बांधवांना एकत्र आणून संविधान दिनाच्या औचित्य व २६ नोव्हेंबर मध्ये लढता लढता वीर झालेल्या शहीद जवानांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्याची कल्पना सामाजिक कार्यकर्ते दिलीप गाडेकर



यांनी मांडली व प्रत्यक्षात अमलात आणली गेली हे विशेष. मुंबई अध्यक्ष श्री. विलास गोरेगावकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी श्री. गिरीराज शेरखाने यांनी स्वतःहून उद्देशिकेचे प्रती व शहिदाचे छायाचित्र प्रति मोफत वाटप केल्या या कामी श्री. शंकर बळी, सुनील पवार,विजय खरात, किरणताई पोटे, दिलीप दडस, बाबा कदम, पंडित कदम यांनी पुढाकार घेतला होता. कार्यक्रमाच्या शेवटी २६ नोव्हेंबर मध्ये वीर जवानांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर दिलीप गाडेकर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

## जाहीर प्रकटन

सर्व जनतेस कळवण्यात येते की मौजे भातोडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील रहिवाशी नामे अरुण संपतराव खेडेकर यांचा जन्म दिनांक 07/01/1992 ही आहे व त्यांचा जन्म भातोडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथे झाले आहे
जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम 1969 च्या कलम 13 (3) 10(3) प्रमाणे तहसीलदार जाफराबाद यांचा आदेशानुसार -
अर्जदार यांचा जन्म दिनांक 07/01/1992 रोजी भातोडी ता. जाफराबाद जि. जालना येथे झाला असून असे सर्वत्र जाहीर करीत आहे करिता जाहीर प्रकटन

# निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या संचालकपदी सुजाता तनपुरे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या संचालकपदी वैनतेय प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे यांची बिनविरोध निवड झाली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पतसंस्थेच्या निवड प्रक्रियेसाठी विहित मुदतीत फक्त एकच अर्ज दाखल



झाल्याने त्यांची निवड निश्चित झाली. त्यांच्या नामनिर्देशनावर सूचक म्हणून साहेबराव बर्डे तर अनुमोदक म्हणून बाळासाहेब गुंजाळ यांच्या स्वाक्षऱ्या होत्या.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा निफाडचे सहाय्यक निबंधक कांतीलाल गायकवाड यांनी सुजाता तनपुरे यांची निवड बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा केली. माजी संचालक बाळासाहेब सोनवणे यांच्या रिक्त झालेल्या जागेवर ही निवड करण्यात आली आहे.या वेळी चेअरमन तथा खासदार भास्करराव भगरे, शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे, कैलास भारती, नगरसेवक साहेबराव बर्डे यांनी मनोगते व्यक्त करत तनपुरे यांच्या निवडीचे स्वागत केले.

कार्यक्रमाला उपाध्यक्ष बाळकृष्ण वाजे, कार्यवाह राहुल दवते, संचालक रामराव बनकर, नगरसेवक साहेबराव बर्डे, बाळासाहेब गुंजाळ, गणेश महाले, किरण जाधव, भगीरथ सोनवणे, हेमलता जाधव, सोनाली होळकर, महेंद्रसिंग राजपूत, बाळकृष्ण शिंदे, एन.डी.एस.टी. चे संचालक समीर जाधव, प्रवीण तनपुरे, सुनील होळकर, साक्षी तनपुरे, व्यवस्थापक रतन दिवटे, ज्ञानेश्वर धाटबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पडद्यावरील ही मॅन काळाच्या पडद्याआड



१९६० ते १९८० हा काळ हिंदी चित्रपटसृष्टीत सुवर्णकाळ समजला जातो. या सुवर्णकाळाने हिंदी चित्रपट सृष्टीला एका पेक्षा एक असे अनेक महान कलाकार दिले. या कलाकारांनी आपल्या अभिनयाने हिंदी चित्रपट सृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आता मात्र या सुवर्ण काळाचे साक्षीदार असलेले महान कलाकार एक एक करून आपल्याला सोडून चालले आहेत. असेच एक महान कलाकार ज्यांनी आपल्या अभिनयाने आणि देखणेपणाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले ते हिंदी चित्रपट सृष्टीतील एक महान कलाकार धर्मेंद्र हे ही प्रेक्षकांना कायमचे सोडून गेले. अभिनेते धर्मेंद्र यांनी सोमवारी, २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर एकूणच मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. ८ नोव्हेंबर १९३५ रोजी जन्मलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मोहित केले. १९६० साली अभिनय क्षेत्रात पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास ३०० हून अधिक चित्रपटात भूमिका केल्या . दिल भी तेरा हम भी तेरे हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला चांगले यश मिळाले. राजबिंडा चेहरा आणि मोहक हास्य आणि पिळदार शरीरयष्टी यामुळे त्यांना अनेक रोमँटिक भूमिका मिळाल्या. कारकिर्दीच्या सुरुवातील एक रोमँटिक हिरो म्हणून त्यांनी मोठा पडदा गाजवला. मीना कुमारी, सायरा बानू, शर्मिला टागोर, आशा पारेख, माला सिन्हा, परवीन बाबी, हेमा मालिनी, रीना रॉय, राखी, जया प्रदा या त्या काळातील सर्व मोठ्या अभिनेत्रींसोबत त्यांनी स्क्रीन शेअर केली. पुढे त्यानी ॲक्शनपटात भूमिका केल्या. १९७६ ते १९८४ या काळात त्यांनी अनेक त्यांनी ॲक्शनपट केले. धर्मेंद्र मोठ्या पडद्यावर गुंडांबरोबर नेहमीच दोन हात करत म्हणून त्यांची गरम - धरम आणि ही मॅन अशी ओळख निर्माण झाली. ही मॅन ही बिरुदावली तर त्यांना कायमची चिकटली म्हणूनच त्यांच्या निधना नंतर पडद्यावरचा ही मॅन काळाच्या पडद्याआड गेला अशी बातमी टीव्ही चॅनलवर झळकली. धर्मेंद्र यांनी त्या काळातील सर्व महान दिग्दर्शकांसोबत काम केले. बिमल रॉय, जे पी दत्ता, मोहन कुमार, राजकुमार कोहली, राज खोसला, रमेश सिप्पी या दिग्दर्शकांनी त्यांना आपल्या चित्रपटात नेहमीच संधी दिली. अर्जुन हिंगोरानी यांच्या जवळपास सर्व चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. हकिकत, ममता, अनुपमा, आये दीन बहार के, मेरे हमदम मेरे दोस्त, इज्जत, आँखें, सत्यकाम, आया सावन झुमके, जीवनमृत्यू, मेरा गाव मेरा देश, सीता और गीता, यादोंकी बारात, चुपके चुपके, शोले, धरमवीर, ब्लॅकमेल, जुगणू, कलाकार, दिल्लगी, द बर्निंग ट्रेन, राम बलराम, गुलामी, हुकूमत, बटवारा, क्षत्रिय, जॉनी गद्दार हे आणि यासारखे त्यांनी अभिनय केलेले अनेक चित्रपट गाजले त्यातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यांच्या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय ठरली. त्यांनी अभिनय केलेल्या शोले या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटात त्यांनी साकारलेल्या वीरू या पात्राने तर जवळपास चार पिढ्यांवर अधिराज्य गाजवले. शोले आणि त्यातील जय वीरू याशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहासच पूर्ण होऊ शकत नाही. शोले चित्रपटाची शूटिंग चालू असतानाच ते हेमा मालिनीच्या प्रेमात पडले आणि पुढे दोघांनी लग्न केले. अभिनेते धर्मेंद्र यांनी केवळ हिंदीच नव्हे तर पंजाबी चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी एका मराठी चित्रपटातही भूमिका केली. अभिनेते धर्मेंद्र यांनी काही चित्रपटाची निर्मितीही केली. सनी देवल आणि बॉबी देवल या आपल्या मुलांसाठी त्यांनी अनुक्रमे बेताब आणि बरसात या चित्रपटांची निर्मिती केली. अभय देवल या आपल्या भाच्यासाठीही त्यांनी सोचा न था या चित्रपटाची निर्मिती केली. पुढे त्यांनी राजकारणातही प्रवेश केला. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राजस्थान मधील बिकानेर मधून भाजप कडून निवडणूक लढवली आणि जिंकली पण राजकारण हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणातून निवृत्ती स्वीकारीत पुन्हा आपला मोर्चा अभिनयाकडे वळवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. २०१२ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट सृष्टीवर आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा महान कलाकार प्रेक्षकांना सोडून गेला. त्यांचे जाणे अकाली नव्हते तरीही त्यांचे जाणे प्रेक्षकांसाठी चटका लावून जाणारे ठरले. अभिनेते धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**

## विविधतेतून एकता साधण्यासाठी संविधान आचरण अनिवार्य – मुख्याध्यापक अशोक शेळके



**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** विविधतेतून एकता साधण्यासाठी संविधानातील तत्वांचे प्रत्यक्ष आचरण करणे याशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन न्यू इंग्लिश स्कूल, पालखेडचे मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी केले. महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित विद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण प्रगतीचा पाया म्हणजे भारतीय संविधान असल्याचे सांगत शेळके म्हणाले की, "न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही राज्यघटनेची सर्वोच्च मूल्ये आहेत. सन्मानाने जगण्यासाठी घटनेतील प्रत्येक कलमाचा अभ्यास आणि आचरण आवश्यक आहे. संविधानातील प्रत्येक शब्दामागे एक सखोल विचार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांच्या हिताचा सूक्ष्म अभ्यास करून ही घटना तयार केली आहे."

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यालयाच्या वतीने पालखेड गावातून एकता रॅली काढण्यात आली. तसेच रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य फलक प्रदर्शन व संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन यांसारखे विविध उपक्रम घेण्यात आले.

या वेळी मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी तसेच विद्यार्थी व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# '७१ वा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव'

## दिग्गजांसोबत तरुण कलाकार करणार सादरीकरण




**पुणे :** आर्य संगीत प्रसारक मंडळातर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारा 'सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव' यंदा १० ते १४ डिसेंबर दरम्यान होणार आहे. हा कार्यक्रम मुकुंदनगर येथील महाराष्ट्र मंडळ, क्रीडा संकुल इथं होणार आहे. महोत्सवात यावर्षी सादरीकरण करणाऱ्या कलाकारांच्या नावांची घोषणा सोमवारी करण्यात आली. तसंच यंदा निम्म्याहून अधिक कलाकार प्रथमच महोत्सवात सादरीकरण करणार आहेत, अशी घोषणा आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी दिली.

**दिग्गजांसोबत तरुण कलाकार करणार सादरीकरण :** आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांची सोमवारी पत्रकार परिषद होती. यावेळी त्यांनी याबाबत माहिती दिली. "यंदा महोत्सवाचं ७१ वं वर्ष असून महोत्सवाला एकूण ७३ वर्ष झालीत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दोन वर्ष महोत्सव आयोजित करण्यात आला नव्हता. माझे वडील भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी आपले गुरू सवाई गंधर्व यांच्या नावानं सुरू केलेल्या या महोत्सवात आजवर अनेक दिग्गज कलाकारांनी आपली कला सादर केली आहे. यंदा नवोदित तरीही आश्वासक, दमदार कलाकारांना या महोत्सवासारखं व्यासपीठ मिळावं, या हेतूनं दिग्गज कलाकारांसोबत नव्या दमाच्या कलाकारांचं सादरीकरण होणार आहे. या प्रयत्नाद्वारे युवा कलाकारांना एक सक्षम व्यासपीठ देण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करत आहोत," असं श्रीनिवास जोशी यांनी सांगितलं.

**महोत्सवात पहिल्यांदाच कला सादर करणारे कलाकार :** लोकेश आनंद. डॉ. चेतना पाठक, शुभेंद्र राव, सास्कीया राव - दे-हास, ऋषिकेश बडवे, बेलमण्णू, अनुराधा कुबेर, पं. रूपक कुलकर्णी, डॉ. भरत बलवल्ली, मेघरंजनी मेधी, इंद्रायुध मजुमदार, जॉर्ज ब्रूक्स, पं. कृष्णमोहन भट, सत्येंद्र सोलंकी, सिद्धार्थ श्रुती मराठे, अनिरुद्ध ऐताळ, डॉ. एल शंकर हे कलाकार यंदा पहिल्यांदाच आपली कला सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवात सादर करणार आहेत.

# कपिल शर्मा आणि मनजोत सिंग अभिनीत 'किस किसको प्यार करूं २ 'चा ट्रेलर झाला प्रदर्शित

टेलिव्हिजन आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवर सर्वांना हसवणारा कपिल शर्मा आता त्याच्या आगामी 'किस किसको प्यार करूं २' या चित्रपटातून पुन्हा एकदा प्रेक्षकांवर जादू करण्यासाठी सज्ज आहे. हा चित्रपट 'किस किस को प्यार करूं'चा सीक्वेल आहे. आता या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. 'किस किसको प्यार करूं २' चित्रपटाचा ट्रेलर खूप मजेशीर आहे. हा चित्रपट पहिल्या भागाप्रमाणेच खूप मजेशीर असणार आहे. या चित्रपटामध्ये कपिल हा ४ वेगवेगळ्या धर्मांच्या मुलींबरोबर लग्न करणार आहे.





या चित्रपटामध्ये मनजोत सिंग देखील कपिलबरोबर दिसणार आहे. हा चित्रपट गोंधळांनी भरलेला आहे.

**'किस किसको प्यार करूं २' चित्रपटाचा ट्रेलर :** ट्रेलरच्या सुरुवातीला कपिल म्हणतो की, "फादर मला एका मुलीवर प्रेम आहे. मी हिंदू धर्मातून मुस्लिम धर्म स्वीकारला, यानंतर मी मुस्लिमपासून ख्रिश्चन धर्म स्वीकारला पण यानंतरही मला ती मिळाली नाही. त्याऐवजी, मला तिन्ही धर्मांमधून एक पत्नी मिळाली आहे. फादर." आता ट्रेलरमधून हे स्पष्ट होतं आहे की, कपिलचे आयुष्य अशा वादळात बुडाले आहे, ज्यातून बाहेर पडणे त्याच्यासाठी अत्यंत कठीण होईल. आता तो त्याच्या आयुष्यात तिन्ही पत्नींबरोबर राहून किती गोंधळात पडणार, याबद्दल तुम्हाला चित्रपटामध्ये पाहायला मिळेल. याशिवाय ट्रेलरमध्ये तो आणखी एक लग्न करण्याच्या तयारीमध्ये असल्याचा दिसत आहे.

**'किस किसको प्यार करूं २' चित्रपटाबद्दल :** प्रदर्शित झालेल्या ट्रेलरमध्ये तो आपल्या तिन्ही पत्नीना एकमेकांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. 'किस किसको प्यार करूं २' चित्रपट १२ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होत आहे. अनुकुल गोस्वामी दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती गणेश जैन, रतन जैन आणि अब्बास-मस्तान यांनी व्हीनस वर्ल्डवाइड एंटरटेनमेंट अंतर्गत आणि अब्बास-मस्तान फिल्म प्रॉडक्शन्सच्या सहकार्यानं केली आहे.

# 'ये है मोहब्बतें'चा दुसरा सीझन येईल ?; दिव्यांका त्रिपाठी आणि करण पटेल यांनी दिली हिंट...

टीव्ही अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी आणि करण पटेलची 'ये है मोहब्बतें' ही मालिका अनेकांना आवडत होती. आता पुन्हा एकदा ही जोडी 'ये है मोहब्बतें २'मध्ये दिसणार असल्याचा चर्चा आहे. दिव्यांका आणि करणनं त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर स्टार परिवार अवॉर्ड्समधील एकत्र नाचत असतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या जोडप्याचा हा व्हिडिओ आता सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आहे. 'ये है मोहब्बतें २' या मालिकेवर सध्या काम सुरू असल्याचं म्हटलं जात आहे. 'ये है मोहब्बतें २' ही



मालिका लवकरच प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

**'ये है मोहब्बतें २'मालिका प्रेक्षकांना पाहायला मिळेल ? :** करणनं एक व्हिडिओ शेअर करताना लिहिलं , "ये है मोहब्बतेंचा सीझन २' असावा का?!" याशिवाय करणनं शोचे कौतुक करत म्हटलं होतं, "हा एकमेव शो आहे, जो प्रत्येक प्रेक्षकाला आवडू शकतो, मग तो पती, पत्नी, मूल, आजी-आजोबा, भावंड... इत्यादी असो! शेवटी, तो मोहब्बतें आहे." दिव्यांकानं पोस्ट पुन्हा शेअर केली आणि लिहिलं, "मी खूप दिवसांपासून तयार आहे, 'ये है मोहब्बतें'चा सीझन २' हा १२ वर्षांनंतर छोट्या पडद्यावर वापसी करू शकतो. आता दिव्यांका आणि करण पुन्हा एकदा प्रेक्षकांची मनं जिंकण्यासाठी येणार असल्याचं सोशल मीडियावर चर्चा सुरू आहेत.

**दिव्यांका त्रिपाठी आणि करण पटेल यांचं वर्कफ्रंट :** करण पटेल शेवटी ऑक्टोबर २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दारन चू' चित्रपटामध्ये झळकला होता. या चित्रपटाचं दिग्दर्शन भारत रतन यांनी केलं असून यात प्रगती आनंद, किरण भार्गव, अमित दोलावत आणि मनोज जोशी यांच्याही मुख्य भूमिका आहेत. या चित्रपटामध्ये एक व्यक्तीच्या जीवनात निराशा कशी येती आणि तो याचा सामना त्याचा करतो, हे दाखविण्यात आलं आहे. दुसरीकडे दिव्यांका त्रिपाठी शेवटी नोव्हेंबर २०२४मध्ये सुरू झालेल्या जिओ सिनेमा टेलिव्हिजन मालिका 'द मॅजिक ऑफ शिरी'मध्ये दिसली होती.

# महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रकाश पाटकर तर उपाध्यक्षपदी ॲड.सुनील शिर्के यांची निवड; रौप्यमहोत्सवी वर्ष उल्लेखनीय करण्याचा नव्या कार्यकारिणीचा निर्धार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /आण्णासाहेब आहेर :** महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाची द्विवार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २३ नोव्हेंबर २०२५) बी.आर. दंडवते सभागृह,करी रोड येथे अत्यंत उत्साहात आणि सुसंवादपूर्ण वातावरणात पार पडली,सभेत प्रकाश वसंतराव पाटकर यांची संघाच्या अध्यक्षपदी तसेच ॲड.सुनील भार्गवराम शिर्के यांची उपाध्यक्ष निवडी सह कार्यकारणीची ही सर्वानुमते निवड झाली,

महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ ची संस्थापक कै.अशोक तोडणकर यांनी २००१ साली स्थापना करत त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक पत्रकार घडवत,समाजाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली,तसेच समाजकार्याला हे त्यांनी योगदान लाभले, त्यांचा कार्यकाळ हा प्रत्येक सदस्याला आपला माणूस वाटणारा असा राहिला त्यांनी उभारलेला महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघचे येणाऱ्या २०२६ साल हे महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ चे रौप्यमहोत्सवी वर्ष



असून अधिक प्रभावी व उल्लेखनीय करण्याचा निर्धार नवीन कार्यकारिणीने व्यक्त केला.

कै.अशोक तोडणकर यांच्या प्रतिमेचे पूजन, श्रद्धांजली,अहवाल व चर्चासत्राने सभेची सुरुवात*:

सभेची सुरुवात संघाचे संस्थापक कै.अशोक शिवराम तोडणकर यांच्या प्रतिमेला पूजन करून पुष्प अर्पण करत तसेच संघातील दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली,त्यानंतर अध्यक्ष प्रकाश पाटकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली, जमा-खर्चाचा तपशील हिशोब तपासनीस डॉ.एकनाथ नलावडे यांनी सभेसमोर मांडला. हिशोबातील काही मुद्द्यांवर सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नांना डॉ.नलावडे यांनी अत्यंत सविस्तर आणि पारदर्शक उत्तरे दिली. काही तांत्रिक बाबींमध्ये सुधारणा करण्याचे आश्वासन देताना,उपस्थित सभासदांनी दाखवलेल्या जागरुकतेचे कौतुकही अध्यक्ष पाटकर यांनी व्यक्त केले.

निवड प्रक्रिया पारदर्शक व निर्विघ्न: सभासदांना पाठवलेल्या परिपत्रकात डी वार्षिक सर्वसाधारण सभांमध्ये सन २०२५ ते २०२७ एकूण दोन वर्षासाठी कालावधी करता नवीन कार्यकारिणी सदस्यांची निवड करणे साठी २३,नोव्हेंबर २०२५ रोजी निवडणूक घेण्याचे जाहीर करण्यात आले होते त्या अन्वये निवडणूक निर्णय अधिकारी ॲड.सोपानराव बुडबाडकर यांच्या नेमणूकीत २०२४ ते २०२९ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नवी कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली असली तरी घटनेतील दोन वर्षाच्या कालावधीमध्ये फेरबदल करण्याचे सर्वांनी मान्य केले असून सदस्यांचे वयोमर्यादा वाढवणे किंवा काढून टाकणे यावर आवश्यक दुरुस्त्या करण्याबाबतही सर्व सदस्यांमध्ये एकमत झाल्याची नोंद घेण्यात आली,परंतु सदर निवड घटनेत बदल झाल्यानंतर लागू होते की उपस्थितीत सदस्यांच्या कालावधी वाढवण्याच्या मागणीनुसार घटनेत बदलापूर्वीच कार्यकारणी कालावधी पाच वर्षाचा लागू होईल की नाही ह्या बद्दल धर्मदाय आयुक्ताकडून कडून दोन सालासाठी किंवा पाच सालासाठी सदर कार्यकारणी काम करेल याबाबत काही सदस्यांमध्ये संभ्रम अवस्था पाहायला मिळते, परंतु याबाबत धर्मदाय आयुक्ताकडे चेंज रिपोर्ट सादर केल्यानंतर किती वर्षासाठी निवड जाहीर होते हे घटना नियमानुसार पाहणे औचित्याच ठरेल...,निवडणूक निर्णय अधिकारी ॲड.सोपानराव बुडबाडकर यांच्या मार्गदर्शनात निवडणूक प्रक्रिया पार पडली असून निवड प्रक्रिया पारदर्शकतेने आणि एकदिलाने पार पडल्याने सभेमध्ये समाधानाचे वातावरण होते.

नवीन कार्यकारिणी जाहीर: अध्यक्ष : प्रकाश वसंतराव पाटकर,उपाध्यक्ष :ॲड.सुनील भार्गवराम शिर्के,प्रमुख कार्यवाह :अशोक विठ्ठल भोसले, संयुक्त कार्यवाह :१) डॉ. सूर्यभान श्रीराम डोंगरे,२) शशिकांत राजाराम सावंत,खजिनदार : सौ.छाया सिताराम गचके,हिशेब तपासनीस : डॉ.एकनाथ ज्ञानदेव नलावडे

वरील पदे निवड होताना अध्यक्षांची एकमताने निवड करण्यात आली,तर उर्वरित पदे ही इच्छुकांनी स्वतः मागून घेत त्यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शवली

कार्यकारी सदस्य:विश्वनाथ मारुती जगदाळे, महेश्वर भिकाजी तेटांबे,संजय शंकर कांबळे,आण्णासाहेब एकनाथ आहेर,अशोक फकीर लांडगे,पंकजकुमार ध्रुव पाटील,ज्ञानेश्वर कृष्णा कोरगावकर,रमेश दिगंबर नानचे

सल्लागार मंडळ :प्रभाकर शिवराम तोडणकर, पंढरीनाथ भीमाजी तामोरे, जगन्नाथ गोपाल कामत,गुरुनाथ मधूसुदन तिरपणकर,अनिल सखाराम पंडित

महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघटनेला वेळ ज्येष्ठ नागरिक काळातही वेळोवेळी वेळ देणारे वरिष्ठ सदस्य प्रभाकर (आप्पा) तोडणकर यांनी संपूर्ण सभेचे संयमाने निरीक्षण केले व नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. सभेचे नियोजन व सूत्रसंचालन डॉ. सूर्यभान डोंगरे यांनी प्रभावीपणे सांभाळले.

रौप्यमहोत्सवी वर्षात मोठ्या उपक्रमांचा संकल्प:या सभेत संघाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक, पत्रकारहिताचे आणि समाज हिताचे,गुणवंतांचे सन्मान असा विविध स्वरूपाचे अनेक उपक्रम राबवण्याचा निर्धार नवी कार्यकारिणीने व्यक्त केला,महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाच्या उपक्रमांसाठी संघाच्या अनेक सदस्यांनी स्वतःहून आर्थिक योगदान दिल्याबद्दल त्यांच्या संघहिताच्या भावना सभागृहात स्पष्टपणे जाणवल्या चे पाहायला मिळाले.अध्यक्ष प्रकाश पाटकर यांनी सर्व सभासदांनी दाखवलेला चांगला सहयोग,विश्वास आणि सहकार्य याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले."संघाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाला अभूतपूर्व ठरवण्यासाठी सर्व सदस्य एकदिलाने कार्य करतील,"असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले






| मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक - श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ७९ गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514